रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक २०५
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ बुधवार, ११ फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## तिसऱ्या मुंबईसाठीच्या भूसंपादन-भूवाटप धोरणास मान्यता



**मुंबई** : नवी मुंबईच्या शेजारी होणाऱ्या तिसऱ्या मुंबईसाठी अर्थात अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतू (मुंबई पारबंदर प्रकल्प) प्रभाव क्षेत्रासाठी नियुक्त नवनगर विकास प्राधिकरण तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत भविष्यात राबविण्यात येणाऱ्या सर्व विकास प्रकल्पांसाठी भूसंपादन व भूवाटपाबाबतच्या सर्वसमावेशक धोरणास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या धोरणांतर्गत २२.५ टक्के जमीन परतावा धोरण लागू करण्यात येणार आहे. २२.५ टक्के परतावा योजनेंतर्गत देय भूखंडाचे क्षेत्र ४० चौ. मीटरपेक्षा कमी असल्यास रोख मोबदला देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे अटल सेतू प्रभाव क्षेत्रातील नियोजित शहरीकरण, औद्योगिक गुंतवणूक, लॉजिस्टिक्स, निवासी-वाणिज्यिक प्रकल्प आणि पायाभूत सुविधांच्या उभारणीस ठोस दिशा मिळणार आहे.

## अंतरंग

चौल तुलाडदेवी येथे निकालानंतर हाणामारी/२
शेकापची घसरगुंडी अन् भाजपची मुसंडी/४
दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना विजय समर्पित/७

# पनवेलच्या महापौरपदी नितीन पाटील, उपमहापौरपदी प्रमिला पाटील बिनविरोध

### भाजप महायुतीच्या कार्यकर्त्यांकडून आनंदोत्सव



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या महापौरपदी भाजप महायुतीचे नितीन जयराम पाटील यांची, तर उपमहापौरपदी प्रमिला रविनाथ पाटील यांची मंगळवारी (दि. १०) बिनविरोध निवड झाली. शेकाप महाविकास आघाडीकडे आवश्यक संख्याबळ नसल्याने अखेरीस त्यांना आपले उमेदवारी अर्ज मागे द्यावे लागले.

भाजप युतीकडे स्पष्ट बहुमत असल्याने या निवडणुकीत फक्त औपचारिकता बाकी होती. महापौर, उपमहापौर निवडीसाठी विशेष सभेचे आयोजन शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आले होते.

> **पनवेल महापालिकेच्या माध्यमातून पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण तसेच वाहतूक व्यवस्थेच्या बळकटीकरणावर भर देण्यात येईल. नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी पारदर्शक आणि गतिमान प्रशासन देण्याचा प्रयत्न राहील.**
> **-नितीन पाटील, महापौर**

ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी पीठासीन अधिकारी म्हणून काम पाहिले. नवनिर्वाचित महापौर नितीन पाटील यांचा डॉ. पांचाळ यांनी, तर नवनिर्वाचित उपमहापौर प्रमिला पाटील यांचा मनपा आयुक्त मंगेश चितळे यांनी पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.

या निवडीनंतर पनवेल शहरात भाजप व महायुतीच्या कार्यकर्त्यांकडून जल्लोष करण्यात आला. फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशांच्या गजरात आणि 'एकच वादा प्रशांतदादा' अशा घोषणा देत आनंदोत्सव साजरा करण्यात आला. निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महारांच्या अश्वारूढ पुतळ्यास आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष व ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी शहराध्यक्ष जयंत पगडे, अनिल भगत, राष्ट्रवादीचे नेते शिवदास कांबळे, आरपीआयचे नेते प्रभाकर कांबळे यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका, महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. **(पान २ वर..)**



**नवीन पनवेल : येथील पिल्लई युनिव्हर्सिटीच्या उद्घाटन समारंभासाठी आलेले राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, मनपा आयुक्त मंगेश चितळे, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे आदी उपस्थित होते.**



**डोंबिवली : रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजप महायुतीने विजय मिळविला. पनवेल, उरणमधील विजयी उमेदवारांनी तसेच पनवेल महापालिकेचे नवनिर्वाचित महापौर नितीन पाटील आणि उपमहापौर प्रमिला पाटील यांनी मंगळवारी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची भेट घेत आशीर्वाद घेतले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे आदी उपस्थित होते. प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी सर्वांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**






## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांनी स्वीकारला पदभार

**मुंबई : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील दालनात मंगळवारी (दि. १०) पदभार स्वीकारला. या वेळी त्यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण आदरांजली वाहिली.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ विभागांचा पदभार स्वीकारला. या वेळी मंत्री, राष्ट्रवादीचे पदाधिकारी, खासदार आमदार, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



# चौल तुलाडदेवी येथे निकालानंतर हाणामारी

## परस्परविरोधी तक्रार दाखल

**रेवदंडा, अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद निवडणूक निकालानंतर अलिबाग तालुक्यातील चौल येथे विजयोत्सवाला गालबोट लागले. शिवसेना शिंदे गट आणि ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार राडा झाला. यात एका गाडीची काचही फोडण्यात आली. याप्रकरणी परस्पर विरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जिल्हा परीषद निवडणुकीसाठी झालेल्या मतदानाची सोमवारी मतमोजणी झाली. निकालामध्ये अलिबाग तालुक्यातील चौल जिल्हा परीषद मतदार संघातून शिवसेना उमेदवार सचिन राऊळ विजयी झाले तर शिवसेना ठाकरे गटाचे सुरेंद्र म्हात्रे यांचा पराभव झाला. त्यानंतर विजयी झालेले सचिन राऊळ यांच्या कार्यकर्त्यांचा जल्लोष सुरू होता. या आनंदा प्रित्यर्थ संध्याकाळी सचिन राऊळ यांचे नातेवाईक, कार्यकर्ते गाडयांमधून चौल येथील शितळादेवीच्या दर्शनासाठी निघाले.

त्यांच्या गाडयांचा ताफा चौल तुलाडदेवी येथे शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यालयासमोरून जात असताना तेथे उभे असलेल्या ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी एका गाडीवर हल्ला केला. गाडीवर धक्के मारले. लोखंडी रॉडने गाडीची मागची काचही फोडली आणि शिवसेना कार्यकर्त्यांना मारहाण केली. या प्रकरणी राजलक्ष्मी खातीमकर यांनी रेवदंडा पोलीस ठाण्यात केलेल्या तक्रारीवरून पोलीसांनी शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांच्यासह १० ते १२ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

तर ठाकरे गटानेही रेवदंडा पोलीसात तक्रार दिली आहे. निवडणूकीतील पराभवानंतर पक्ष कार्यालयात चर्चा सुरू असताना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी कार्यालयासमोरच फटाके लावण्याचा प्रयत्न केला. त्यातून वाद निर्माण झाला. काही जणांनी कार्यालयात घुसून लाकडी दांडक्याने मारहाण केली तसेच एका महिलेला ओढून तिचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला अशी फिर्याद सुरेंद्र म्हात्रे यांनी दिली आहे. त्यावरून पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. रेवदंडा पोलीस तपास करीत आहेत.

# ‘अपघात रोखण्यासाठी अवजड वाहन तपासणी मोहीम राबवा’



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील आडोशी बोगद्याजवळ घडलेल्या भीषण अपघाताच्या पार्श्वभूमीवर राज्यभरातील अवजड वाहनांवर व्यापक आणि पारदर्शक तपासणी मोहीम राबवण्याचे आदेश प्रताप सरनाईक यांनी दिले. मंत्रालयात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत मोटार परिवहन व पोलीस विभागाच्या अधिकाऱ्यांना त्यांनी स्पष्ट शब्दांत सूचित केले. अपघात रोखायचे असतील तर नियमांची केवळ अंमलबजावणी नव्हे, तर जागरूकतेची चळवळ उभी राहिली पाहिजे. ३ फेब्रुवारी रोजी झालेल्या अपघातामुळे तब्बल ३२ तास महामार्ग वाहतुकीसाठी विस्कळीत झाला. प्रवाशांचे, विशेषतः महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांचे मोठे हाल झाले. प्राथमिक पाहणीत चालकाच्या बेपर्वाईमुळे, वेगाने ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात वाहनावरील ताबा सुटल्याने अपघात घडल्याचे स्पष्ट झाले आहे. यावर भाष्य करताना मंत्री सरनाईक म्हणाले, चालकांच्या वाहन चालवण्याच्या पद्धतीवर नियंत्रण आणि प्रबोधन हीच अपघातमुक्त महामार्गाची गुरुकिल्ली आहे. राज्यातील सर्व अवजड वाहनांची तांत्रिक तपासणी काटेकोर आणि पारदर्शक पद्धतीने व्हावी, असे निर्देश देण्यात आले. विशेषतः फॉर्म १३८/- अंतर्गत दिल्या जाणाऱ्या वाहन योग्यता प्रमाणपत्र प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यावर भर देण्यात आला. काही प्रादेशिक परिवहन कार्यालयांतून प्रमाणापेक्षा जास्त प्रमाणपत्रे दिल्याचे निदर्शनास आल्याने त्याबाबत तातडीने चौकशी करून अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

**‘ब्लॅक स्पॉट’वर विशेष लक्ष**

महामार्गावरील अपघातप्रवण ठिकाणांची (ब्लॅक स्पॉट्स) माहिती चालकांपर्यंत पोहोचवणे, त्या भागात प्रवेश करण्यापूर्वी समुपदेशन व सूचना देणे, तसेच पोलीस व परिवहन विभागाने संयुक्तरीत्या जनजागृती मोहीम राबवणे-या उपाययोजना तातडीने अमलात आणण्याचे आदेश देण्यात आले. अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी सविस्तर अहवाल महामार्ग अपघात रोखण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांचा सविस्तर अहवाल येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी सादर करण्याचे निर्देशही मंत्री सरनाईक यांनी संबंधित विभागांना दिले. अपघाताची वेदना अजून ताजी असताना शासनाने घेतलेली ही धडक भूमिका म्हणजे केवळ प्रशासकीय हालचाल नाही, तर प्रत्येक प्रवाशाच्या सुरक्षिततेसाठी उचललेले ठोस पाऊल आहे. नियम, नियंत्रण आणि जागरूकता या त्रिसूत्रीवरच सुरक्षित प्रवासाचा पाया उभा राहणार, असा स्पष्ट संदेश या बैठकीतून देण्यात आला.

# रायगड जि.प. आरोग्य विभागामार्फत २६ आरोग्यसेविकांची समुपदेशानाद्वारे पदोन्नती

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत जिल्ह्यातील २६ महिला आरोग्यसेविकांची समुपदेशानाद्वारे पदोन्नती प्रक्रिया मंगळवारी (ता.१०) रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.

रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागांतर्गत जिल्ह्यात असणा-या प्राथमिक आरोग्य केंद्रातील महिला आरोग्यसेविकांची पदोन्नती प्रक्रिया सुमपदेशनाने पार पडली. आरोग्य सेवक या पदावर कार्यरत असलेल्या पात्र अशा एकूण २६ महिला कर्मचा-यांना आरोग्य सहाय्यक (महिला) वर्ग-३, श्रेणी-२ (तांत्रिक) या पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. यामध्ये दोन दिव्यांग महिला आरोग्यसेविकांचा समावेश आहे. पदोन्नती देण्यात आलेल्या सर्व कर्मचा-यांना मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या हस्ते पदोन्नतीचे आदेश देण्यात आले.

समुपदेशानातून पदोन्नती प्रक्रिया पार पडल्यामुळे महिला कर्मचा-यांनी समाधान व्यक्त केले. तसेच सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार व्यक्त केले. यामुळे जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे.या पदोन्नती प्रक्रियेदरम्यान सामान्य प्रशासन उपमुख्य कार्यकारी अधिकारी जालिंदर पठारे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर आदी उपस्थित होते.

# विधीमंडळ परिसरात स्व. अजितदादांचे तैलचित्र लावले जाणार

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी (दि. १०) रोजी झालेल्या बैठकीमध्ये परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी विधीमंडळ परिसरामध्ये दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे तैलचित्र लावण्याची मागणी केली.

यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून येणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे तैलचित्र विधिमंडळ परिसरात लावण्यात येणार आहे.

# पोलादपूर नगरपंचायतीच्या विविध विषय समित्यांची निवड



**पोलादपूर : प्रतिनिधी**

नगरपंचायत पोलादपूरच्या बैठकीमध्ये नव्याने विविध विषय समित्यांची निवड होऊन विषय समिती सभापतीपदी सत्ताधारी नगरसेवकांची वर्णी लावण्यात आली. शिवसेनेचे नगराध्यक्षपद भूषवित पुन्हा दुसऱ्यांदा नगरसेविका निवडून आलेल्या सुनीता ज्ञानदेव पार्टे यांनी राजिनामा दिल्यानंतर गेल्या १०-१२ महिने पद रिक्त असून त्याजागी पोटनिवडणूक लावण्याऐवजी तिसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीला सामोरे जाण्याची तयारी सत्ताधाऱ्यांकडून केली जात आहे.

सार्वजनिक बांधकाम समिती सभपतीपदी सिध्देश संजय शेठ तर अस्मिता उमेश पवार, नागेश पवार, दिलीप भागवत, गणेश घाटे यांची सदस्यपदी निवड करण्यात आली. पाणीपुरवठा व दिवाबत्ती समिती सभापतीपदी निखिल कापडेकर, विनायक दिक्षित, मृगया शहा, स्वप्नील भुवड, आशा सचिन गायकवाड यांची सदस्यपदी वर्णी लागली. नियोजन, अर्थ, क्रीडा व सांस्कृतिक कार्य समिती सभापतीपदी सोनाली गायकवाड, मनोज प्रजापती, विनायक दिक्षित, स्वप्नील भुवड, आशा गायकवाड यांची निवड करण्यात आली. सार्वजनिक आरोग्य व मालमत्ता कर समिती सभापती प्रसाद इंगवले, नागेश पवार, मृगया शहा, श्रावणी शहा, तेजश्री गरूड यांची निवड करण्यात आली.

# महड येथील श्री वरदविनायकाला दीड किलो चांदीचा मुकुट अर्पण



**खोपोली : प्रतिनिधी**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र महड येथील इच्छापूर्ती करणारा श्री वरदविनायक गणपती बाप्पा चरणी दररोज असंख्य भक्तगण येत मनोभावे पूजाअर्चा करत असतात. श्री वरदविनायक गणपती बाप्पा भक्तांच्या नवसाला पावत असल्याने असाच श्री वरदविनायक गणपती बाप्पा उरण तालुक्यातील चिरले येथील समीर सुधाकर पाटील व भाग्यश्री पाटील यांना पावल्याने या दांपत्याने गणपती बाप्पाला १० फेब्रुवारी रोजी दीड किलोचा चांदीचा मुकुट अर्पण केला . हा चांदीचा मुकुट समीर पाटील यांनी महड देवस्थानकडे सुपूर्द केल्याने महड देवस्थानच्या वतीने त्यांचा सन्मान केला.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते रवि शेळके, पंकज मढवी, विराज कोळी, जयेश पाटील, अक्षय पाटील, नितेश पाटील, विजय सोनी, महड देवस्थानचे राजेंद्र बडगुजर, अशोक बागुल, राजेश झानपुरे गुरुजी आदी उपस्थित होते. भक्तांच्या नवसाला पावणारा ओळख असलेल्या महड हे श्री वरदविनायक गणपती बापाच्या खजिन्यात चांदीच्या दागिन्यांची भर पडली असून, उरण तालुक्यातील चिरले येथील नक्ष लॉजिटिकचे समीर सुधाकर पाटील व भाग्यश्री पाटील या दांपत्य भाविकाकडून श्री वरदविनायका चरणी दीड किलो चांदीचा मुकुट अर्पण केला .त्याची किंमत ४ लाख २५ हजार आहे .त्याचा मंदीर समितीच्यावतीने सत्कार करण्यात आला.

# आजपासून रायगड पोलीस दल भरती प्रक्रिया

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दलातील ९७ जागांसाठी बुधवारपासून (दि.११) भरती प्रक्रियेला सुरुवात होत आहे. ही भरती पोलीस मुख्यालय, अलिबाग येथे होणार आहे. पोलीस भरती प्रक्रिया व्यवस्थित पार पडावी यासाठी रायगड पोलीस दलाने तयारी पूर्ण केली आहे.

पोलिस शिपाई पदाच्या ९४ तर चालक पोलीस शिपाई पदाच्या ३ जागा भरण्या येणार आहेत. ९७ जागांसाठी एकूण ५ हजार ३७३ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. पोलिस शिपाई पदासाठी एकूण ३ हजार ५६३ अर्ज आले आहेत . त्यामध्ये २ हजार ९१५ पुरुष उमेदवार आणि ६४८ महिला उमेदवारांचा समावेश आहे. चालक शिपाई पदाच्या ३ रिक्त जागांसाठी १ हजार ८१० अर्ज दाखल झाले आहेत.

# स्मार्ट मीटर वापरा आणि स्मार्ट बना!



**मुंबई : प्रतिनिधी**

नवीन तंत्रज्ञान लोकांच्या जीवनाला सुलभ बनवण्यातच नव्हे तर कमी वेळेत खूप कार्यक्षम पद्धतीने व अचूकपणे काम करण्यात सुद्धा मदत करते. आपल्याला या स्पर्धात्मक जगाशी सुसंगत राहण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे महत्वाचे आहे.

मुख्य अभियंता भांडुप परिमंडल, श्री. संजय पाटील यांनी ग्राहकांना स्मार्ट मीटर वापरण्याबाबत आवाहन केले आहेत. तसेच म्हणाले कि, आपण इतर सर्व क्षेत्रात नव नवीन तंत्रज्ञानाचा आत्मसात केला आहे तर मग वीज क्षेत्रात स्मार्ट मीटर वापरण्याबद्दल ग्राहकांच्या मनात इतकी शंका बाळगण्याचे कारण काहीच नाही. पूर्वीचे मोबाईल, टीव्ही व घड्याळ हे सर्व आता स्मार्ट झाले आहेत पण केवळ स्मार्ट मीटर लावण्या बाबतीत आपले अनेक गैरसमझ आहेत. या सर्व गैरसमझ दूर करून ग्राहकांनी स्मार्ट मीटर लावण्यात महावितरणला सहकार्य करावे, असे त्यांनी यावेळी आवाहन केले.

नवीन स्मार्ट मीटर कशासाठी ? वीजमीटर हा बिलिंगचा आत्मा आहे. अचूक रीडिंग साठी जुन्या वीज मीटर उपयुक्तता संपल्यामुळे आता स्मार्ट मीटर लावण्यात येत आहे. ही एक नेहमीचीच प्रक्रिया आहे. पूर्वीच्या मेकॅनिकल (यांत्रिकी), इलेक्ट्रोमॅग्नेटिक (चकतीचे), स्टॅटीक, इलेक्ट्रॉनिक्स वीज मीटर प्रवासानंतर आता मीटर डिजिटल तंत्रज्ञान आले आहे.

**स्मार्ट मीटरचे फायदे**: स्मार्ट टीओडी मीटरमध्ये दिवसाच्या वेगवेगळ्या वेळेनुसार विजेचा वापर मोजला जातो व त्यावेळेच्या दरानुसार आकारणी केली जाते. त्याप्रमाणे दि. १ जुलै २०२५ पासून शहरी व ग्रामीण भागातील सर्व लघुदाब घरगुती व उच्चदाब हाऊसिंग सोसायटी वीजग्राहकांना दररोज सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीमध्ये वापरलेल्या विजेसाठी प्रतियुनिट ८० पैसे ते १ रुपया टप्प्याटप्प्याने सवलत मिळते.

स्मार्ट टीओडी मीटरमधून वीज वापराचे मासिक रीडिंग स्वयंचलित पद्धतीने घेतले जाते. त्यामध्ये कुठलाही मानवी हस्तक्षेप होत नाही. पर्यायाने अंदाजे, सरासरी किंवा रीडिंग न घेता वीजबिल दिल्याच्या तक्रारी देखील स्मार्ट मीटरमुळे संपणार आहे. स्मार्ट मीटरमध्ये प्रत्येक तासाला, दिवसाला, आठवड्याला, महिन्याला व वर्षाला किती युनिट वीज वापरली याची माहिती मोबईल ॲपवर उपलब्ध राहते. त्यातून स्वतः च्या घरातील वीज वापर तपासता येते व नियंत्रणात ही ठेवता येते. ग्राहकांमध्ये स्मार्ट मीटर बद्दल अनेक गैरसमज आहे जसे की, स्मार्ट मीटर हे प्रीपेड मीटर आहे. स्मार्ट टीओडी मीटर हे पोस्टपेड मीटर आहे. आधी वीज वापरा व नंतर मासिक बिल भरा या आताच्या पद्धतीनेच स्मार्ट मीटर बसवल्यानंतर वीजबिल देण्यात येत आहेत. स्मार्ट टीओडी मीटर मोफत नाही. खरं तर, स्मार्ट मीटर साठी कोणतेही शुल्क नाही. महावितरणतर्फे, स्मार्ट टीओडी मीटर ग्राहकांकडे पूर्णपणे मोफत बसविण्यात येत आहे. तरी, सर्व ग्राहकांनी स्मार्ट मीटर लावण्याच्या प्रक्रियेत महावितरणच्या कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे.

पान १ वरुन

# पनवेलच्या महापौरपदी नितीन पाटील, उपमहापौरपदी प्रमिला पाटील बिनविरोध

पनवेल महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक भाजप महायुतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, माजी खासदार व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली लढवली. या निवडणुकीत भाजपने ५५, शिवसेनेने दोन आणि राष्ट्रवादी काँग्रेसने दोन जागांवर विजय मिळवत एकूण ५९ जागांसह पनवेल महापालिकेवर पुन्हा एकदा भाजप महायुतीची भक्कम सत्ता प्रस्थापित केली.

नवनिर्वाचित महापौर नितीन पाटील आणि उपमहापौर प्रमिला पाटील यांनी पनवेल शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्राधान्याने काम करण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. या वेळी बोलताना महापौर नितीन पाटील यांनी या संपूर्ण विजयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, आणि समस्त मतदार पनवेलकरांचे मनःपूर्वक आभार मानले, तर सर्वांनी नवनिर्वाचित महापौर व उपमहापौरांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

महापौर नितीन पाटील यांना आदराने ’भाई’ म्हणून संबोधले जाते. पनवेल तालुक्यातील कासारभाट त्यांचे मूळ गाव. सामाजिक कार्य चालवत पुढे त्यांनी राजकारणात पदार्पण केले. दोन वेळा नगरसेवक म्हणून जबाबदारीने काम केले. सभागृहातील त्यांचा अनुभव, विषयांची सखोल मांडणी आणि विकासाभिमुख दृष्टिकोन यामुळे ते नेहमीच चर्चेत राहिले आहेत. त्यांचा जनसंपर्क व्यापक व मजबूत असून ते नागरिकांच्या समस्या मार्गी लावण्यासाठी तत्पर असतात. भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सरचिटणीस म्हणून त्यांनी संघटनात्मक पातळीवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पनवेल विधानसभा निवडणुकीत त्यांनी निवडणूक प्रमुख म्हणून केलेले नियोजन, समन्वय आणि नेतृत्व पक्षाच्या यशात महत्त्वाचे ठरले आहे.

सामाजिक कार्याची आवड असल्याने नितीन पाटील हे सुरुवातीपासूनच विविध समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सक्रिय राहिले आहेत. अभिनव मित्र मंडळाचे कार्याध्यक्ष तसेच जाणीव या सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष म्हणून शिक्षण, आरोग्य, आपत्ती व्यवस्थापन आणि गरजू घटकांसाठी विविध उपक्रम यशस्वीपणे ते राबवतात. सामाजिक, राजकीय आणि संघटनात्मक कार्याची दखल घेत त्यांच्यावर महापौरपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली असून आगरी समाजाचा पहिला महापौर म्हणून त्यांनी सन्मान मिळविला आहे.

उपमहापौर प्रमिला पाटील या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या क्रांतिभूमी शिरढोण गावाची लेक आहेत. भाजप कळंबोली मंडळाच्या खजिनदार व सामाजिक कार्यकर्त्या असलेल्या पाटील यांनी आपल्या कार्यातून कळंबोलीच्या राजकारणात ओळख निर्माण केली आहे. महिला बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक-सामाजिक सबलीकरण करत त्यांनी शासनाच्या योजना प्रभावीपणे तळागाळात पोहचवल्या. नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक ७, ८ व ९मधून भाजप महायुतीचे १२पैकी १२ उमेदवार विजयी झाले. प्रभाग ७मधून प्रमिला पाटील यांनी विद्या गायकवाड यांचा पराभव केला. सामाजिक कार्य व संघटन कौशल्यामुळे त्यांना उपमहापौरपदाची संधी मिळाली आहे.

पनवेल महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीतील पराभवाचा धक्का सावरत नाही, तोच जिल्हा परिषद आणि पनवेल पंचायत समितीच्या निवडणुकीतही शेकापप्रणित महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला. या निवडणुकीत पनवेल पंचायत समितीमध्येही शेकापचे अस्तित्व संपुष्टात आले. एक अर्थाने जनतेने शेकापला सपशेल नाकारले आहे. त्याचा उत्साह मंगळवारी झालेल्या भाजप महायुतीच्या रॅलीतील जल्लोषातून दिसून आला.

# कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयाच्या ’फार्म फियेस्टा’चा शुभारंभ



**कर्जत : प्रतिनिधी**

कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयाचा ’फार्म फियेस्टा’ वार्षिक संम्मेलनाचा शुभारंभ करण्यात आला. या संम्मेलनात विद्यार्थ्यांनी क्रीडा, सांस्कृतिक माध्यमातून आपले गुणदर्शन सादर करीत असून त्यानंतर पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात येणार आहे.

कोकण ज्ञानपीठ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणात ’फार्म फियेस्टा’ वार्षिक संम्मेलनाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे उपाध्यक्ष प्रकाश मुथ्था यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचे उदघाट्न करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे सचिव प्रदिपचंद्र श्रुंगारपुरे, खजिनदार झुलकरनैन डाभीया, स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य विजय मांडे, प्राचार्य डॉ. मोहन काळे, उपप्रचार्य डॉ. अमोल चांदेकर, विद्यार्थी प्रतिनिधी प्रज्वल खांडकर, सुशील गायकवाड आदी उपस्थित होते.

डॉ. मोहन काळे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रस्ताविकात महाविद्यालयाचा चढता आलेख सादर केला. मांडे यांनी, ’ तत्कालीन उच्च शिक्षण मंत्री अप्पासाहेब धारकर यांनी कर्जतसारख्या ग्रामीण भागात पस्तीस वर्षांपूर्वी उच्च शिक्षणाची कवाडे उघडून दिली.

## दुखवटा

**कमळाकर साखळे**



**रेवदंडा :** अलिबाग कृषी उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान अध्यक्ष व सुमित्र पतसंस्थेचे विद्यमान अध्यक्ष कमळाकर उर्फ आप्पा साखळे यांचे मुंबई येथील खासगी रूग्णालयात अल्पशा आजाराने निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय ७४ वर्ष होते. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, दोन कन्या, एक मुलगा, सुन, जावई, नातवंडे, असा परिवार आहे. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच विविध स्तरातील मंडळींनी त्यांच्या अंत्यदर्शनासाठी गर्दी केली होती.

# शेकापच्या पारंपरिक जागा भाजपकडे



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम नेतृत्वाखाली देशभरात तसेच महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासाभिमुख दूरदृष्टीतून राज्यात वेगाने विकासकामे सुरू आहेत. याच विकासाच्या धर्तीवर रायगड जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्ष सातत्याने प्रभावी कार्य करत आहे. पनवेलमध्ये माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपने जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत बाजी मारली आहे.

रायगड जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी सन २०२५मध्ये अनेक नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायत सरपंच यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांसोबत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. या प्रवेशानंतर रायगड व नवी मुंबई परिसरात भाजपच्या संघटनात्मक बळाला मोठी चालना मिळाली असून पक्ष संघटना अधिक मजबूत झाली आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारले आहे.

नुकत्याच पार पडलेल्या पनवेल महानगरपालिका निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने एकहाती विजय मिळवत आपले वर्चस्व सिद्ध केले. या विजयाची सुरुवात प्रितम म्हात्रे यांच्या प्रभाव असलेल्या प्रभागातून झाली, जिथे दोन नगरसेवक बिनविरोध निवडून आले. त्यानंतर पनवेल शहर परिसरातून आणखी चार नगरसेवक बिनविरोध निवडून येत एकूण सहा नगरसेवक बिनविरोध निवडून आले. विशेष म्हणजे शेतकरी कामगार पक्षातून भाजपत प्रवेश केलेल्या उमेदवारांना भाजपतर्फे संधी देऊन पुन्हा निवडून आणण्यात आले, ज्यामुळे भाजपचा विजय अधिक ठोस ठरला.

शेतकरी कामगार पक्षाचा पारंपरिक गड मानल्या जाणाऱ्या गव्हाण, वडघर, केळवणे, वावंजे, वावेघर, पळस्पे आदी जिल्हा परिषद मतदारसंघांमध्येही भाजपने आपली पकड भक्कम केली आहे. जिल्हा परिषद निवडणुकीदरम्यान गावोगावी भेटी देत भारतीय जनता पक्षाची विचारधारा, केंद्र व राज्य सरकारच्या विकासकामांची माहिती तसेच तरुणांसाठी रोजगार निर्मितीचे नियोजन प्रभावीपणे मतदारांपर्यंत पोहचवण्यात आले. परिणामी पारंपारिक शेकाप मतदारांमध्ये सकारात्मक मतपरिवर्तन होऊन भाजपच्या उमेदवारांना जनतेचा स्पष्ट कौल मिळाला.

या संपूर्ण प्रक्रियेत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर तसेच माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली. महायुतीतील सर्व घटक पक्षांचा समन्वय साधत आमदार प्रशांत ठाकूर थेट मतदारांपर्यंत पोहचून प्रभावी मोर्चेबांधणी केली. यामध्ये युवा नेतृत्व माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे आदींनी एकत्रितपणे केलेल्या प्रयत्नांमुळे भाजपने हा विजय एकहाती मिळवला, हे विशेषत्वाने अधोरेखित करावे लागेल.

**आदरणीय जे.एम. म्हात्रेसाहेबांच्या नेतृत्वाखाली आम्ही भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्यानंतर पक्षाच्या विचारधारेनुसार रोजगार आणि विकासाच्या दृष्टिकोनातून कामे सुरू केली. ही कामे प्रभावीपणे मतदारांपर्यंत पोहचवण्यात आम्हाला यश आले. त्यामुळेच शेकापच्या पारंपरिक मतदारसंघातील मतदारांनी भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेला मान्यता देत विकासाच्या बाजूने कौल दिला. याबद्दल मी सर्व मतदारांचे मनापासून आभार मानतो.**

**-प्रितम म्हात्रे,** माजी विरोधी पक्षनेते, पनवेल महानगरपालिका

# घरफोडी करणारे सराईत गुन्हेगार ३६ तासांत जेरबंद

**पनवेल : वार्ताहर**

घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगारांना खांदेश्वर पोलिसांनी अवघ्या ३६ तासात जेरबंद करून त्यांच्याकडून गुन्ह्यातील जवळपास पावणे १० लाख रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने हस्तगत केले आहेत.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिसरात होत असलेल्या दिवसा घरफोडीच्या गुन्हयाना आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्त मिलींद भारंबे व पोलीस सह आयुक्त संजय येनपुरे, अप्पर पोलीस आयुक्त (गन्हे) दिपक साकोरे तसेच पोलीस उपायुक्त परि ०३, पनवेल प्रशांत मोहिते, सहा पोलीस आयुक्त सो, भाउसाहेब ढोले यांनी वेळोवेळी केलेल्या सुचना नुसार खांदेश्वर वपोनि स्मिता ढाकणे, मा. पोनि (गुन्हे) सचिन परदेशी यांच्या सुचने नुसार घटनास्थळा वरील सीसीटीव्ही फुटेज प्राप्त करून तसेच आरोपी येण्याजाण्याच्या मार्गाचा अभ्यास करून मार्गीके वरील फुटेज तपासले.




पोलीस खात्यातील उपलब्ध तांत्रिक साधनांच्या मदतीने व गोपनिय बातमीदारांच्या प्राप्त माहीती घेत असताना खांदेश्वर पोलीस ठाणेचे सपोनि उत्तम घेगडमल, राजरत्न खैरनार, पोहवा महेश कांबळे, वाघमारे, रणजित पाटील, वैभव शिंदे, धिरेंद्र पाटील, पोशि सचिन पवार, विकास कामनुरकर, स्वप्निल कोळी, युवराज शिवगुंडे, ऋषिकांत परदेशी आदींच्या पथकाला या गुन्ह्यातील आरोपी रफिक माझीद शेख, (३५ रा.जोगेश्वरी मुंबई), मोहम्मद बिलायत अब्दुल रहिम खान (३० रा.नालासोपारा), शकिल रुबील शेख (३० रा.बांद्रा, मुंबई) या ठिकाणी स्वतः चे अस्तित्व लपवून राहत असल्याबाबत माहीती प्राप्त झाली.

याबाबत पथकासह शिताफिने ताब्यात घेवून सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. आरोपीकडे केलेल्या तपासात त्यांच्याकडून गुन्हयातील घरफोडी करून चोरलेले ९५ ग्रॅम सोन्याचे व ५२ ग्रॅम चांदीचे दागीने असे एकूण ९,५६,१५०/- रू कि व गुन्हा करण्यासाठी वापरलेले हत्यारे हस्तगत करण्यात आले आहेत. सदर गुन्ह्याचा तपास सपोनि उत्तम घेगडमल करीत आहेत.

## निवडक

### कळंबोलीतून वृद्ध व्यक्ती बेपत्ता



**पनवेल :** ८० वर्षीय वृद्ध व्यक्ती कळंबोली वसाहतीमधून हरवल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. गजानन कृष्णा तांबुसकर असे या व्यक्तीचे नाव असून त्याचा बांधा-मजबुत, उंची १६८ सेमी, रंग-सावळा, चेहरा उभट, तोंडात एकही दात नाही, नाक सरळ, केस कमी टक्कल पडलेले, दाढी पांढरी, अंगात आकाशी शर्ट, काळी पॅन्ट असून त्याला मराठी, हिंदि येते. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी कळंबोली पोलीस ठाणे किंवा पोहवा एम. बी पवार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### साईबाबांच्या पादुकांचे दर्शन

**पनवेल :** साई मंदिरात शिर्डी येथील साईबाबांच्या पादुकांचे दर्शन होणार आहे. येणाऱ्या १८ फेब्रुवारी १९ फेब्रुवारी आणि २० फेब्रुवारी रोजी पनवेल येथील साई मंदिरात शिर्डी येथून साईंच्या पादुका येणार आहेत. तीन दिवस या पादुकांचे दर्शन सर्व साई भक्तांना घेता येणार आहे. या कार्यक्रमाचे स्वागत करण्यासाठी पनवेलकर निश्चितच उत्सुक असणार आहेत. या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती देण्यात आली असून श्री साई नारायण बाबा यांच्या ९० व्या जयंती उत्सवानिमित्त साई मंदिर, साई नारायण बाबा आश्रम पनवेल येथे या पादुका दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहेत.

# शहिदी समागम शताब्दीनिमित्त आरंभता की अरदास कार्यक्रम



**खारघर : रामप्रहर वृत्त**

हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५०व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी खारघर, नवी मुंबई येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमाची 'आरंभता की अरदास' संत समाजचे प्रधान संत ज्ञानी हरनाम सिंघ जी, मुखी दमदमी टकसाल यांच्या हस्ते ओवे मैदान, सेक्टर २९, खारघर, नवी मुंबई येथे करण्यात आली.

या वेळी कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, ठाणे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, उपजिल्हाधिकारी रवींद्र राठोड, सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक राजा दयानिधी, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे, पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, अपर आयुक्त फरोग मुकादम, उपायुक्त विजय म्हसाळ, पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते, रश्मी नांदेडकर, वाहतूक उपायुक्त तिरुपती काकडे, हिंद दी चादर कार्यक्रमाच्या राज्यस्तरीय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, क्षेत्रिय आयोजन समिती, नवी मुंबईचे अध्यक्ष अमरपाल सिंघ रंधावा, सुप्रीम कॉन्सील, नवी मुंबई गुरुद्वाराचे अध्यक्ष जअसाल सिंग सिद्धू, खारघर गुरुद्वाराचे अध्यक्ष परमजित सिंग बल, महाराष्ट्र राज्य सिख समन्वय समितीचे चरणदीप सिंग (हॅप्पी सिंग), राज्यस्तरीय समितीचे निमंत्रक तथा महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमीचे कार्याध्यक्ष बल मिलकित सिंग, नवी प्रेस क्लबचे अध्यक्ष तथा कोकण विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष मनोज जालनावाला यांच्यासह शीख, सिकलगर, बंजारा, लबाना, मोहयाल, सिंधी, वाल्मिकी, उदासीन तथा भगत नामदेव (वारकरी) संप्रदाय समाजातील प्रतिनिधी उपस्थिती होते.



**पनवेल : स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी भाजप महायुतीच्या यशाबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट अभिनंदन केले.**



**कामोठे : सेक्टर २४ येथे आयोजित संत श्री गजानन महाराज प्रकट दिन सोहळ्यानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून गजानन महाराजांची विधीवत पूजा करून दर्शन घेतले. त्यांनी सर्व भाविकांना गजानन महाराजांच्या प्रकट दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक उपस्थित होते.**

## धोदाणीत महाशिवरात्री उत्सव

**पनवेल :** तालुक्यातील धोदाणी गावामध्ये धोदाणेश्वर महाशिवरात्री उत्सवाचे आयोजन रविवारी (दि.१५) करण्यात आले आहे.

या उत्सवामध्ये अभिषेक सोहळा, सामुदायिक आरती, हरिपाठ, पालखी सोहळा, फलाहार, भजन असे कार्यक्रम होणार आहेत. या कार्यक्रमांना हभप बामामहाराज, हभप पद्माकरमहाराज पाटील, हभप शंकर जोमा फडके, हभप धाऊशेठ पाटील, हभप चांगू नागो वाघ यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

या सर्व कार्यक्रमांचे व्यवस्थापन भजन मंडळ धोदाणी, श्री राम समर्थ महिला मंडळ, धोदाणी, श्री गणेश संघ धोदाणी, ३जी संघ धोदाणी, चॅलेंजर संघ धोदाणी, श्री राम संघ धोदाणी, मोरया संघ धोदाणी, साईनाथ संघ धोदाणी, जय हनुमान संघ चापाली, लाऊड स्पिकर सेवा सितारारू पदू चौधरी (धोदाणी) करणार आहेत.

कार्यक्रमासाठी रामचंद्र चौधरी, वामन चौधरी, अनंता चौधरी, भिमीबाई चौधरी, बामी चौधरी, ताई चौधरी आदी मेहनत घेत आहेत.

# सीकेटी महाविद्यालयात माजी विद्यार्थी डॉ. वैभव तांबट यांचा विद्यार्थ्यांशी संवाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथील सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे माजी विद्यार्थी डॉ. वैभव तांबट यांनी सोमवारी (दि.९) महाविद्यालयास भेट दिली. या वेळी त्यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य व सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील प्राध्यापकांची सदिच्छा भेट घेतली.



डॉ. वैभव तांबट यांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये सूक्ष्मजीवशास्त्र विषयात पदवी शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांनी नॅशनल काओशुंग युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी, तैवान येथून पीएच.डी. पदवी संपादन केली असून सध्या ते तैवान येथे पोस्ट-डॉक्टोरल संशोधन करत आहेत.

या भेटीदरम्यान त्यांनी सूक्ष्मजीवशास्त्र विषयातील (भाग १ व २)च्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. आपल्या संशोधनातील अनुभव, आंतरराष्ट्रीय संशोधन संधी तसेच सूक्ष्मजीवशास्त्रातील विविध संशोधन क्षेत्रांबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांचे अनुभव व तज्ज्ञ मार्गदर्शन विद्यार्थ्यांना संशोधन क्षेत्रात करिअर घडविण्यास निश्चितच उपयुक्त ठरणार आहे.

या प्रेरणादायी संवादामुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाबाबत उत्सुकता निर्माण झाली असून भविष्यातील संशोधन वाटचालीसाठी त्यांना योग्य दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. या उल्लेखनीय यशाबद्दल डॉ. वैभव तांबट यांचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या वेळी सूक्ष्मजीवशास्त्र विभागप्रमुख प्रा. निलेश वडनेरे, प्रा. निलीमा तिदार, प्रा. गणेश साठे, प्रा. सौ. अर्चना गांधारकर, डॉ. अन्वेष वेमुला, प्रा. नमिता गरुडे व डॉ. श्वेता हुम्बरवाडी यांनी डॉ. वैभव तांबट यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# चिरनेरमध्ये मशरूम उत्पादनाचा यशस्वी प्रयोग

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील, उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा अंबुलगेकर यांच्या विशेष पुढाकारातून आणि चिरनेर गावातील बचत गटाच्या महिलांच्या मेहनतीतून मशरूमच्या शेतीचा प्रयोग यशस्वी करण्यात आला आहे.



या अनुषंगाने आत्मा योजनेअंतर्गत महिलांना मशरूम उत्पादनासाठी आवश्यक साहित्य देऊन, मार्गदर्शन करण्यात आले. ही योजना केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात प्रयोगातून यशस्वी करून दाखविली आहे. याचे श्रेय अर्चना सुळ नारनवर व सुषमा अंबुलगेकर या कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबर चिरनेर येथील बचत गटाच्या सोनाली जाधव, अंजली चिर्लेकर, ज्योती म्हात्रे, सुकन्या रसाळ, नेहा फोफेरकर, निर्मला भोईर, प्रणिता मोकल, रेवती ठाकूर, बिंदिया म्हात्रे व कामिनी हातनोलकर या सहभागी महिलांना जाते.

या महिलांनी दिलेल्या संधीचे सोने केले आहे. प्रशिक्षण, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी मशरूम उत्पादनात समाधानकारक यश मिळवले आहे. स्वकष्टातून त्यांनी आर्थिक उत्पन्नाचे साधन निर्माण केले आहे. हे त्यांच्या आत्मविश्वासाचे आणि कार्यक्षमतेचे उत्तम उदाहरण आहे. त्यांच्या कामातून स्वावलंबन, शिस्त आणि जबाबदारीची जाणीव स्पष्टपणे दिसून येते.या योजनेच्या यशामागे महिलांची सकारात्मक वृत्ती, शिकण्याची तयारी आणि त्यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न महत्त्वाचे ठरले आहेत.

बचत गटाच्या महिलांनी केलेले काम पाहून मला वैयक्तिक पातळीवरही मोठे समाधान मिळाले आहे. रायगडच्या आत्म्याच्या प्रकल्प संचालक वंदना शिंदे यांनी केलेली विशेष मदत तसेच कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा अंबुलगेकर यांनी बचत गटाच्या महिलांना प्रत्येक टप्प्यावर केलेले मार्गदर्शन व घेतलेले विशेष परिश्रम यामुळे हा महिलांना आर्थिक उत्पादनासाठी नवसंजीवनी देणारा प्रयोग यशस्वी झाला आहे. भविष्यातही अशाच प्रकारे त्या नवनवीन प्रयोग करत राहतील. आणि समाजाची प्रगती साधतील. याची मला खात्री वाटते. हे काम ग्रामीण विकासासाठी प्रेरणादायी आहे, असे उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर यांनी सांगितले.

**हा प्रयोग करण्यासाठी मोठा चॅलेंज होता. अडचणी होत्या, पण केवळ शेतकऱ्यांची प्रगती साधण्यासाठी, मी एक कृषी सहाय्यक अधिकारी म्हणून पुढाकार घेऊन, मशरूमचे उत्पादन घेण्याचा निर्णय घेतला. हा प्रयोग २२ दिवसांचा आहे. शेतकऱ्यांकडे सहज उपलब्ध होणाऱ्या पेंढ्याच्या भुशाचा या मशरूमच्या प्रयोगासाठी वापर केला जातो. डायबिटीस, हार्ट अटॅक यासारख्या आजारांवर मशरूमची भाजी गुणकारी आहे. भाजी चविष्ट असून ती हेल्दी आहे. हा प्रयोग शेतकऱ्यांना नवसंजीवनी देणारा आहे.**

**-सुषमा अंबुलगेकर,** कृषी सहाय्यक अधिकारी

# आठ महिन्यांच्या गर्भवती हर्षदा घरत यांचा शानदार विजय

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पळस्पे जिल्हा परिषद मतदारसंघात केवळ निकाल लागलेला नाही तर रायगडच्या राजकारणाची दिशा बदलणारा इतिहास घडला आहे. आठ महिन्यांच्या गरोदर अवस्थेतही न डगमगता, गावोगावी, वाडी-वस्ती, डोंगर-दऱ्यांतून फिरत जनतेशी थेट संवाद साधत प्रचार करणाऱ्या भारतीय जनता पार्टीच्या हर्षदा अतुल घरत यांनी तब्बल ६,८२९ मतांच्या प्रचंड फरकाने विजय मिळवत रायगड जिल्ह्यातील ५९ जागांपैकी सर्वाधिक मताधिक्याचा सर्वकालीन विक्रम प्रस्थापित केला आहे.

हा विजय म्हणजे विरोधकांच्या सत्तेच्या स्वप्नांवर फिरवलेला हातोडा, वर्षानुवर्षांची राजकीय मक्तेदारी उद्ध्वस्त आणि महिला नेतृत्वाच्या ताकदीचा प्रचंड विजय! जेव्हा काहीजण प्रचार कार्यालयात बसून रणनीती आखत होते, तेव्हा हर्षदा घरत स्वतः रस्त्यावर उतरून जनतेच्या अडचणी ऐकत होत्या. गरोदरपणाचा थकवा, आरोग्याच्या मर्यादा या सगळ्यांवर मात करत त्यांनी हा रणसंग्राम जिंकला.



महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात रायगडच्या इतिहासात आजवर नोंद न झालेला असा इतका मोठा मताधिक्याचा विजय हा केवळ आकडा नाही, तो जनतेने दिलेला थेट राजकीय इशारा आहे. हा विजय सत्ता बदलाचा नाही, तो मानसिकतेचा बदल आहे.

## संपादकीय

# अखरे गुडघे टेकले

टी-२० वर्ल्डकपमध्ये पाकिस्तान भारताविरुद्ध खेळला नसता, तर आयसीसीचेही मोठे आर्थिक नुकसान झाले असते. त्यामुळे रविवारच्या सामन्याबाबतची अनिश्चितता संपवण्यासाठी आयसीसीही प्रयत्नशील होतीच. क्रिकेटमधला पैसा हवा असल्याने पाकिस्तान अखेरीस गुडघे टेकणारच होता. त्यामुळेच आयसीसीलाही त्यांना नमवणे शक्य झाले.

**टी-२० वर्ल्डकपदरम्यान भारताविरुद्धच्या सामन्यावर बहिष्कार टाकण्याची धमकी देत पाकिस्तानने पुन्हा एकदा क्रिकेटचा वापर राजकीय दबावासाठी करण्याचा प्रयत्न केला. भारताविरुद्ध कुरापती करण्याची संधी पाकिस्तान नेहमीच शोधत असतो. यावेळी बांगलादेशमुळे ती संधी त्यांना मिळाली होती, परंतु पाकिस्तान क्रिकेट मंडळाच्या (पीसीबी) मागण्या फेटाळून लावत आयसीसीने त्यांच्यावर आपला निर्णय मागे घेण्याची स्थिती निर्माण केली आणि अखेर टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील भारताविरुद्धच्या सामन्यावर टाकलेला बहिष्कार पाकिस्तान सरकारने मागे घेतला. भारतीय संघ आज पाकिस्तानच्या तुलनेत निश्चितपणे सरस आहे. त्यामुळेच खेळाच्या मैदानावर जिंकता येत नसले तरी भारताविरुद्ध कुरापती काढण्याचे उद्योग पाकिस्तानकडून नेहमी केले जातात. आताही त्याच हेतूने पाकिस्तानने ही नौटंकी केली असावी. श्रीलंकेचे राष्ट्राध्यक्ष आणि बांगलादेशच्या नेत्यांनी केलेल्या विनंतीनंतर पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी बहिष्कार मागे घेतल्याची माहिती दिली. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील ही लढत १५ फेब्रुवारी रोजी कोलंबो येथे होणार आहे. रविवारचा हा सामना रद्द झाला असता, तर श्रीलंकेचे मोठे आर्थिक नुकसान झाले असते. सोमवारी पीसीबी आणि बीसीबी (बांगलादेश क्रिकेट मंडळ) यांच्यादरम्यान झालेल्या बैठकीनंतर पाकिस्तान आयसीसीसमोर गुडघे टेकणार याचे पुरेसे संकेत मिळाले होते. जर १५ फेब्रुवारीला ते भारताविरुद्ध मैदानात उतरले नाहीत, तर क्रिकेटविश्वातली त्यांची उरलीसुरली विश्वासार्हताही संपुष्टात आली असती. बीसीबीचे प्रमुख अमिनुल इस्लाम यांनी खेळाच्या व्यापक हितासाठी पाकिस्तानला मैदानात उतरण्याचे आवाहन करणारे निवेदन प्रसिद्ध केले. त्यानंतर पाकिस्तान आपली भूमिका मागे घेणार हे स्पष्ट झाले. आता क्रिकेट खेळाच्या हिताला आपण महत्त्व देत असल्यामुळे भारताविरुद्धचा हा सामना खेळण्यास आपण राजी झालो, असा आव पाकिस्तान आणत आहे, पण भारताविरुद्धचा रविवारचा सामना खेळण्यास तयार झालेल्या पाकिस्तानची गुर्मी यावेळी जिरली आहे. भारताविरुद्ध क्रिकेट खेळायची वेळ आली की पाकिस्तानला नेहमीच राजकारण आठवते. अशावेळी अटीशर्ती पुढे करण्याची खेळी पाकिस्तानकडून नेहमीच केली जाते. १५ फेब्रुवारीला भारताविरुद्धचा बहिष्कार मागे घेण्यासाठी पीसीबीने आयसीसीसमोर तीन अटी ठेवल्या होत्या. भारत-पाक द्विपक्षीय मालिका पुन्हा सुरू करण्याची हमी, आयसीसीच्या उत्पन्नातील वाटा वाढवून मिळावा आणि नो हँडशेकसारख्या मुद्यांवर वेगळी नियमावली करावी अशा या मागण्या होत्या. त्याशिवाय बांगलादेशच्या नावाखाली भरपाईचीही मागणी करत आपला फायदा करून घेण्याचा प्रयत्नही पाकिस्तानने केला. आयसीसीने मात्र या सर्व मागण्या फेटाळून लावल्या आहेत. भारतातील आबालवृद्ध क्रिकेट रसिकांना भारत-पाक सामन्यात नेहमीच प्रचंड रस असतो. अर्थात, आयसीसीकडूनही हे आकर्षण जपण्याची काळजी नेहमीच घेतली जाते, कारण त्यांचे अवघे नफ्याचे गणित जुळून येण्यात याचा वाटा मोठा असतो. त्यादृष्टीने आयसीसीला पाकिस्तानलाही सांभाळावे लागते. स्वत:ची किंमत वसूल करण्याच्या दृष्टीने पाकिस्तानने फायदा घेतला तर मग त्यात आश्चर्य ते कसले? या खेपेला या अवघ्या वादामुळे भारत-पाक सामन्याला हवी तशी भरपूर प्रसिद्धी अर्थातच मिळाली आहे.**

# शेकापची घसरगुंडी अन् भाजपची मुसंडी!

रायगड जिल्हा परिषद आणि जिल्ह्यातील १५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीत संमिश्र कौल समोर आला आहे. झेडपीत कोणत्याही पक्षाला बहुमत मिळालेले नाही. त्यामुळे एकपेक्षा अधिक पक्षांना एकत्र येऊन सत्ता स्थापन करावी लागणार आहे. कित्येक वर्ष जिल्हा परिषदेवर अधिराज्य गाजवणारा शेकाप यंदा भुईसपाट झाला असून भाजपने मुसंडी मारली आहे.



जिल्ह्यात पूर्वी शेकाप आणि काँग्रेस हे दोन पक्ष प्रबळ होते. खासदारकी, आमदारकी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही याच पक्षांचा बोलबाला असे. हळूहळू काँग्रेसची घसरण सुरू झाली, पण स्थानिक पातळीवर शेकाप तग धरून होता. अनेक स्थित्यंतरे घडून गेली, तरीही वेगवेगळ्या युत्या-आघाड्या करून शेकाप आपले अस्तित्व टिकवून होता, मात्र पक्षनेतृत्वाने सत्तेसाठी ध्येय धोरणांना हरताळ फासून वेळोवेळी सोयीस्कर भूमिका घेतल्याने शेकापला उतरती कळा लागली. या दरम्यान काळानुरूप पावले न टाकल्यामुळे आणि नवे नेतृत्व तयार न केल्याने अनेक नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते शेकाप सोडून गेले. परिणामी स्थानिक पातळीवरदेखील शेकापचा ऱ्हास झाल्याचे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत प्रकर्षाने दिसून आले आहे.

आधी नगर परिषद आणि नगरपंचायत निवडणुकीत शेकापला जिल्ह्यात अपेक्षित यश मिळू शकले नाही. एकमेव अलिबाग नगरपालिकेतील सत्ता त्यांनी काँग्रेसची सोबत घेऊन राखली. त्यानंतर पनवेल महापालिकेत शेकापची कमालीची पीछेहाट झाली. आता तर गेली अनेक वर्षे सत्ता असलेल्या जिल्हा परिषदेत शेकापला एकही जागा जिंकता आली नाही. त्याचप्रमाणे पनवेल पंचायत समितीमध्ये शेकापचा सुपडा साफ झाला असून अलिबाग पंचायत समितीची सत्तासुद्धा शेकापच्या हातून गेली आहे. एकेकाळी इतर सर्व पक्षांविरुद्ध शेकाप स्वबळावर निवडणुका लढून विजय मिळवित असे. एवढा या पक्षाचा दरारा होता. त्याच शेकापला आता तीन, चार पक्षांशी आघाडी करूनदेखील सत्ता मिळवायची सोडाच, पण सन्मानजनक जागाही जिंकता आल्या नाहीत.

**खबरबात**
**समाधान पाटील**

सातत्याने विकासाला विरोध करायची भूमिका शेकापच्या मुळावर उठली आहे. मुंबईच्या जवळ असल्याने विविध प्रकल्प पनवेलसह रायगड जिल्ह्यात येत आहेत. त्यात स्थानिकांना कसा रोजगार मिळेल हे पाहण्याऐवजी सरसकट त्या प्रकल्पाला विरोध करायची कार्यपद्धती शेकापची राहिलेली आहे. त्याचाच फटका त्यांना बसला आहे. शिवाय मोठ्या प्रमाणात शहरीकरण होत असताना त्याच्याशी जुळवून घेण्यात शेकाप कमी पडला. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे शेकाप हा ठराविक नेत्यांच्या अधीन असून तेच ते नेते वर्षानुवर्षे पक्षाचा गाडा हाकत आहेत. वेळीच नवे आणि ताज्या दमाचे नेतृत्व तयार न झाल्याने या पक्षात मरगळ आली. या साऱ्याचा परिणाम शेकापच्या अधोगतीवर झाल्याचे स्पष्टपणे जाणवते.

दुसरीकडे एकेकाळी जिल्ह्यात अस्तित्वासाठी झगडणारा भाजप एव्हाना भक्कमपणे पाय रोवून उभा राहिला आहे. या पक्षाच्या यशाचा आलेख प्रत्येक निवडणुकीत उंचावत आहे. नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीतही भाजप महायुतीने मिळवलेले यश वाखाणण्याजोगे आहे. जिल्हा परिषदेत भाजपने कधी नव्हे इतक्या १५ जागा जिंकल्या. यापैकी सर्वाधिक आठ जागा पनवेल तालुक्यातील आहेत. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या दमदार नेतृत्वाखाली भाजपने पनवेलमधील जिल्हा परिषदेच्या सर्वच्या सर्व आठ जागा जिंकून नवा इतिहास रचला आहे. त्याचबरोबर पनवेल पंचायत समितीमध्ये १६पैकी १५ जागी 'कमळ' फुलवत शेकापचे संस्थान खालसा केले आहे. यामध्ये माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले तसेच इतर नेतेमंडळी, पदाधिकारी, नगरसेवक-नगरसेविका, आजी माजी सरपंच, उपसरपंच, सदस्य आणि कार्यकर्त्यांची मेहनतही कामी आली.

जिल्हा परिषदेत २१ जागा जिंकून शिवसेना शिंदे पक्ष सर्वात मोठा ठरला आहे. त्या खालोखाल राष्ट्रवादी अजित पवार पक्ष १६ आणि भाजप १५ असे प्रमुख पक्षांचे बलाबल आहे, तर विरोधकांमध्ये शिवसेना ठाकरे गटाला पाच जागा मिळाल्या असून काँग्रेसला दोन जागांवर समाधान मानावे लागले आहे. या स्थानिक निवडणुकीत वेगवेगळ्या युत्या-आघाड्या झाल्या होत्या, पण आता झेडपीमध्ये सत्तास्थापनेसाठी राज्य आणि केंद्र सरकारमध्ये असलेल्या घटक पक्षांना एकत्र यावे लागेल. या प्रक्रियेत भाजपला प्रामुख्याने विचारात घ्यावे लागणार आहे.

## लेखिका गौरी देशपांडे

गौरी देशपांडे यांचा जन्म ११ फेब्रुवारी १९४२ रोजी झाला. गौरी देशपांडे या चौकटीबाहेर लिहिणार्या मराठीतील लेखिका म्हणून परिचित होत्या. कथा, कादंबरी, ललित लेख, स्फुट लेखन, ललितेतर लेखन, भाषांतर, कविता, संशोधन यासारखे बहुतांशी सगळे साहित्यप्रकार गौरी देशपांडे यांनी हाताळले. मराठीबरोबरच त्यांचे बरेचसे इंग्रजी लिखाण तसेच काही इंग्रजी-मराठी व मराठी-इंग्रजी अनुवादसुद्धा प्रकाशित झाले.

प्रसिद्ध लेखिका, संशोधक इरावती कर्वे या गौरी देशपांडे यांच्या मातोश्री होत. दिनकर धोंडो उर्फ डी. डी. कर्वे हे त्यांचे वडील. जाई निंबकर या इंग्रजी व मराठीतील लेखिका त्यांच्या थोरल्या भगिनी. 'समाजस्वास्थ्य' या लैंगिक शिक्षण देणार्या स्वातंत्र्यपूर्व काळातील मासिकाचे संपादक र. धों. कर्वे हे गौरी देशपांडे यांचे सख्खे काका.गौरी देशपांडे यांचे पुण्यातच प्रामुख्याने वास्तव्य राहिले आहे. काही काळ मुंबईत, बर्याचशा परदेशवार्या व विंचुर्णी,मराठी साहित्याला स्त्री लेखिकांची मोठी परंपरा लाभली आहे. असंख्य स्त्रियांनी निरनिराळ्या पातळीवरून स्त्री आयुष्याच चित्र



वाचकांपुढे उभं केलं. ह्या सगळ्या प्रभावळीत गौरी देशपांडे यांनी केलेल्या लिखाणाचं वेगळेपण हे विशेष आहे. त्याआधीच्या बर्याचशा साहित्यात स्त्रियांचे कौटुंबिक प्रश्न किंवा पुरुषी वर्चस्वामुळे निर्माण झालेले प्रश्न चर्चिले गेले होते. गौरी देशपांडे यांची पिढी ही स्वातंत्र्योत्तर पिढी होती.

स्त्रियांपुढचे प्रश्न बदलले होते. संपले नव्हते. स्त्रीने शिक्षणासाठी, नोकरीसाठी घराचा उंबरठा ओलांडण्याची सवय समाजाला झाली होती. गौरी यांची पिढी ह्या प्रश्नांपासून पुढे आली होती. समाजाने स्त्रीकडे 'व्यक्ती' म्हणून बघावं अशा विचारांच्या प्रभावाखाली होती. गौरी देशपांडे यांच्या लेखनात तिच्या मुक्त विचारांचं प्रतिबिंब अगदी स्पष्ट दिसतं. तिचं लेखन स्त्रीवादी असण्यापलीकडे जाऊन स्वातंत्र्यवादी, व्यक्तिवादी होतं. वेगवेगळ्या पातळीवरचं प्रेम, त्या प्रेमाची मोजावी लागणारी किंमत आणि त्या प्रेमाच्या मर्यादा ह्याबद्दलचे विचार तिच्या लेखनात दिसतात. स्त्रीवादाच्या वाटेवरून जाणार्या कोणत्याही आधुनिक, मराठी साहित्यप्रेमी माणसाला गौरी देशपांडे हे नाव टाळून पुढे जाता येत नाही. तो एक अपरिहार्य टप्पा असतो, असंच तिचं लेखनकर्तृत्व आहे. लेखणीचा 'धीट'पणामुळे विशेष गाजली. दिवाळी अंकांमधून तिनं लिहिलेल्या काही छोटेखानी 'लोक'कथाही लक्षणीय आहेत.

गौरी देशपांडे यांच्या धीटपणामुळे गौरीवर 'बंडखोर लेखिका' हा शिक्का मारला गेला. अशा या महान लेखिकेचे १ मार्च २००३ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# उन्हाळ्यात कमी होणार नाही तुमच्या कारचे मायलेज

नवीन कार खरेदी करत असताना सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण गाडीचे मायलेज किती आहे हे पाहिले जाते. खरेतर, ज्या कारला मायलेज चांगले असते, ती कार खरेदी करण्याला लोकपसंती देतात. मात्र, उन्हाळ्यामध्ये गाडीचे मायलेज कमी होते,



उन्हाळ्यामध्ये एसीशिवायचा प्रवास हा खूप अवघड होऊ शकतो. उन्हाळ्यापासून वाचण्यासाठी आणि प्रवास आरामदायी होण्यासाठी एसीचा वापर करतात. गाडीचा एसी जेवढ्या जास्त प्रमाणात वापरला जाईल, तितकेच मायलेज कमी होते. एसी सुरू असल्याने गाडीमध्ये असलेल्या इंजिन किंवा मोटरवर ताण येतो. अशामध्ये ते मेंटेन करण्यासाठी इंजिनला आधी ताकद निर्माण करावी लागते. त्यासाठी इंजिन इंधनाचा वापर करते.

वाहनाच्या कमी मायलेजला ड्रायव्हिंग स्टाईलही कारणीभूत आहे. विनाकारण गाडी सुरू ठेवणे, क्लच, गिअर व ब्रेकचा योग्य वेळी वापर न करणे या गोष्टींमुळेही गाडीचे मायलेज कमी होऊ शकते.गाडीच्या चाकांमध्ये पुरेशी हवा नसली तरीदेखील मायलेज कमी होण्याची शक्यता असते. चाकांमध्ये हवेचा दाब कमी असतो तेव्हा गाडी चालवताना इंजिनवरील दाब वाढतो. त्यामुळे इंधनाचा जास्त वापर इंजिनाकडून केला जातो. त्यामुळे मायलेज कमी होऊ शकते. तसेच गाडीचा मेंटेनन्स वेळेत केला गेला नाही तरीदेखील मायलेजवर परिणाम होऊ शकतो.

उन्हाळ्यात प्रवास करताना एसीचा वापर हा अत्यावश्यक असतो. उन्हाळ्यात कारचा एसी सतत वापरल्याने मायलेजवर परिणाम होतो. त्यामुळे आवश्यक असेल तेव्हाच एसीचा वापर करा म्हणजे मायलेजदेखील कमी होणार नाही.

जर का तुमची गाडी खूप काळपासून बंद असेल आणि आतून गाडी उन्हामुळे खूप तापली असेल, तर एसी सुरू करण्यापूर्वी गाडीच्या खिडक्या उघडा आणि आतील गरम हवा बाहेर जाऊ द्या. त्यासाठी तुम्ही गाडीतील पंखादेखील वापरू शकता. गरम हवा बाहेर गेल्यावर एसी सुरू करा. सुरुवातीला पूर्ण क्षमतेने एसी सुरू करू नये. गाडीला हळूहळू थंड होऊ द्या. तुमच्या गाडीला सनरूफ असेल, तर ते व्यवस्थित बंद ठेवावे.उन्हाळ्यामध्ये तुम्ही तुमची गाडी शक्यतो सावलीत उभी त्या ठिकाणी उभी करावी

# पं. दीनदयाळ उपाध्याय

भारतीय जनता पार्टी सहसंस्थापक पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा ११ फेब्रुवारीला स्मृतीदिन आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय हे एक हिंदुत्ववादी विचारवंत आणि भारतीय राजकारणी होते. त्यांनी हिंदू शब्दाचा अर्थ धर्मानुसार नव्हे तर भारतीय संस्कृतीच्या रुपात सांगितला.

पंडित दीनदयाळ उपाध्याय हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित होते. शिवाय भारतीय जनसंघाचे अध्यक्ष होते. त्यांनी राजकारणाशिवाय भारतीय साहित्यात योगदान दिले. त्यांनी लिहिलेल्या सम्राट चंद्रगुप्त नाटक बहुतेकांना आवडले. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मदतीने भारतीय जनसंघाची स्थापना केली. नागपुरात दीनदयाळ उपाध्याय थाली सुरू करण्यात आली. याचे श्रेय माजी महापौर संदीप जोशी यांना आहे. ही थाली मेडिकल येथील रुग्णाच्या नातेवाईकांना पुरविली जाते. हजारो रुग्णांचे नातेवाईक या थालीचा लाभ घेतात. अशाप्रकारे देशभर दीनदयाळ उपाध्याय यांना मानणारे नागरिक आहेत.

२५ सप्टेंबर १९१६ रोजी उत्तर प्रदेशातील मथुरा जिल्ह्यात दीनदयाळ उपाध्याय यांचा जन्म झाला. वडील भगवती



**निमित्त**

उपाध्याय भारतीय रेल्वे विभागात नोकरीला होते. आई रामप्यारी यांनी त्यांचा सांभाळ केला. पंडित दीनदयाळ यांचे आईवडील धार्मिक होते. दीनदयाळ यांचे आजोबाही रेल्वेमध्ये स्टेशन मास्टर होते. लहानपणीचं त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला. सात वर्षांचे असताना आईही आजारपणात गेली. याचा फार मोठा आघात त्यांच्या बालमनावर झाला.


डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी १९५१ मध्ये भारतीय जनसंघ पार्टीची स्थापना केली. पंडित दीनदयाळ उपाध्याय हे भारतीय जनसंघ पार्टीचे सह-संस्थापक होते. १९५३ मध्ये श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या निधनानंतर जनसंघाची जबाबदारी दीनदयाळ यांच्यावर आली. सुमारे पंधरा वर्षे संघटन महामंत्री म्हणून काम केल्यानंतर १९६७ मध्ये ते जनसंघाचे अध्यक्ष झाले. ११ फेब्रुवारी १९६८ मध्ये रेल्वे यात्रेदरम्यान दीनदयाळ यांच्या मृत्यूने देश हादरला. त्यांच्या रहस्यमय मृत्यूने काही प्रश्न निर्माण झाले होते. कारण त्यांचा मृतदेह उत्तर प्रदेशातील मगलसराय रेल्वे स्टेशन लाईनवर सापडला होता. दीनदयाळ यांचा मृत्यू नेमका कसा झाला, हे रहस्य अद्याप कायम आहे.

१० फेब्रुवारी १९६८ रोजी संध्याकाळी दीनदयाळ लखनौवरून पटणाला जाण्यासाठी सियालदाह एक्सप्रेसमध्ये बसले होते. त्यांची ट्रेन मध्यरात्री दोन वाजता मुगलसरायला पोहचली, परंतु तिथं दीनदयाळ नव्हते.

ट्रेन आल्यानंतर दहा मिनिटांनी त्यांचा मृतदेह सापडला होता. त्यांच्या हातात पाच रुपयांची नोट होती. त्यांना जौनपूर येथे मध्यरात्री पाहिले गेले होते. त्यांच्या मृत्यूचा तपास सीबीआयने केला. सीबीआयने भरतलाल आणि त्यांच्या सहकाऱ्याला त्यांच्या हत्येच्या आरोपात अटक केली गेली. चोरी केल्यानंतर दीनदयाळ यांना ट्रेनमधून धक्का मारून बाहेर फेकले असावा, असा अंदाज आहे.

(साभार : इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# तुरीच्या डाळीचे 'हे' आरोग्यदायी फायदे

वरण किंवा आमटी सहसा तुरीची किंवा मुगाची केली जाते. चण्याच्या डाळी ऐवजी काहीजण तुरीच्या डाळीपासून पुरण बनवतात आणि त्यापासून बनवलेल्या पुरणपोळ्या तुपाबरोबर सेवन केल्या जातात. त्या सुद्धा अतिशय रुचकर लागतात. दक्षिण भारतातही सांबर किंवा रसम करण्यासाठी तुरीच्या डाळीचा वापर केला जातो. काही पित्त प्रकृतीच्या व्यक्तींना तुरीचं वरण किंवा आमटी खाल्ली की त्रास होतो, पण त्या व्यतिरिक्त तूर हे कडधान्य रोजच्या आहारात असणं चांगलं असतं.



तुरीची डाळ कृमीनाशक म्हणजे जंताचा नाश करणारी असते आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे शरीरातल्या कफदोषाला आणि अवाजवी प्रमाणात वाढलेल्या मेदाला कमी करणारी असते. त्यामुळे वजन कमी करायचं असेल तर संध्याकाळच्या जेवणात तुरीची पातळ आमटी आणि ज्वारी, बाजरीची भाकरी खाणं उत्तम आहे.

तुरीचं वरण किंवा आमटी बनवण्यासाठी डाळ शिजताना त्यात थोडं जास्त पाणी घालावं, डाळ छान शिजली आणि पातेल्याच्या तळाशी गेली की वरचं पाणी काढून टाकावं. तुरीची डाळ अधिक पथ्यकर असते. जखम भरून आल्यानंतर किंवा त्वचारोग बरा झाल्यानंतर कधी कधी त्वचेवर डाग शिल्लक राहतात. यावर तुरीची डाळ शिजत असताना त्यात हळकुंड टाकावं आणि नंतर ते उगाळून त्याचा लेप लावावा. यामुळे त्वचेचा वर्ण पुन्हा पुर्ववत होण्यास मदत मिळते.

पचन संस्था चांगली आणि निरोगी आरोग्यासाठी आपल्या आहारामध्ये तुरीच्या डाळीचा समावेश करा. तसेच पचनयोग्य तंतुमय पदार्थांसाठी आणि निरोगी आहारासाठी तुरीची डाळ चांगली असते.

वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी तुम्ही तुमच्या आहारामध्ये तुरीची डाळ समावेश करू शकता आणि ते तुमच्यासाठी फायदेशीर आहे. तसेच तुरीच्या डाळीमध्ये पोषक घटकही जास्त प्रमाणात आहेत.

अनेकांना जळजळ होण्याची समस्या सारख्या जाणवत असतील तर तुम्ही तुरीच्या डाळीचे सेवन करू शकता. तसेच डाळीच्या सेवन केल्यास जळजळ होणे हे त्रास कमी होते. तर पाईल्सची समस्या असेल तर तुम्ही तुरीच्या डाळीचे सेवन करा.

# शासकीय रुग्णालयांतील शुल्क आकारण्याच्या वृत्ताचे सार्वजनिक आरोग्य विभागाकडून खंडन

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखाली कार्यरत असलेल्या सर्व शासकीय रुग्णालयांमधील तपासणी व उपचार हे २३ ऑगस्ट २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये पूर्णतः नि:शुल्क करण्यात आलेले असून ही सुविधा आजही पूर्वीप्रमाणेच लागू आहे, असा महत्त्वाचा खुलासा सार्वजनिक आरोग्य विभागाने केला आहे. त्यामुळे शासकीय रुग्णालयांमध्ये रुग्णांकडून उपचारासाठी शुल्क आकारले जाणार असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते परंतु या प्रसिद्ध झालेल्या बातम्यांमध्ये कोणतेही तथ्य नाही, असे संबंधित विभागाने स्पष्ट केले आहे.

अलीकडे काही राष्ट्रीय व राज्यस्तरीय वृत्तमाध्यमांमध्ये सरकारी रुग्णालयांमध्ये मोफत उपचार बंद होणार तसेच शासकीय रुग्णालयांमध्ये सेवा शुल्क आकारले जाणार अशा आशयाच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. या बातम्यांमुळे श्रीवर्धन तालुक्यासह ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांमध्ये संभ्रम आणि चिंता निर्माण झाली होती. याची दखल घेत सार्वजनिक आरोग्य विभागाने अधिकृत खुलासा प्रसिद्ध केला आहे.

**नागरिकांच्या सनदेमधील तांत्रिक चूक कारणीभूत**

सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, १६ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या नागरिकांच्या सनदेमधील परिशिष्ट-३ मध्ये सेवा सुविधा पुरविण्यासाठी ६ जून २०१५ च्या शासन निर्णयातील शासनमान्य दर अनावधानाने समाविष्ट झाले होते. या तांत्रिक चुकीमुळे शासकीय रुग्णालयांमध्ये उपचारांसाठी शुल्क आकारले जाणार असल्याचा चुकीचा अर्थ काढण्यात आला.

प्रत्यक्षात, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय रुग्णालयांमध्ये तपासणी, निदान व उपचार हे २३ ऑगस्ट २०२३ च्या शासन निर्णयानुसार पूर्णतः नि:शुल्क करण्यात आले आहेत, आणि त्या निर्णयामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही, असे विभागाने स्पष्ट केले आहे.

**शुद्धीपत्रक काढून परिशिष्ट-३ वगळले**

ही बाब लक्षात येताच सार्वजनिक आरोग्य विभागाने ९ फेब्रुवारी २०२६ रोजी शुद्धीपत्रक जारी करून नागरिकांच्या सनदेमधील परिशिष्ट-३ पूर्णतः वगळण्यात आले आहे. त्यामुळे शासकीय रुग्णालयांमधील तपासणी व उपचार मोफतच राहतील, याबाबत कोणतीही शंका उरलेली नाही.

या निर्णयामुळे श्रीवर्धन तालुक्यातील ग्रामीण भागातील, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. तालुक्यातील ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच उपकेंद्रांमधून पूर्वीप्रमाणेच मोफत आरोग्य सेवा दिली जाणार आहे.आरोग्य सेवा मोफत राहणार असल्याने गोरगरीब रुग्णांना खासगी रुग्णालयांकडे वळण्याची गरज भासणार नाही, तसेच उपचार खर्चामुळे होणारा आर्थिक भार टळणार असल्याचे मत नागरिकानी व्यक्त केले

## *अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन*

***सार्वजनिक आरोग्य विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, शासकीय रुग्णालयांबाबत पसरविल्या जाणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नये आणि कोणत्याही शंका असल्यास अधिकृत शासन आदेश व विभागीय सूचनांचीच माहिती घ्यावी.राज्य सरकार सर्वसामान्य नागरिकांना सुलभ, दर्जेदार व मोफत आरोग्य सेवा देण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.***

# खालापूर पं.स.च्या विजयी उमेदवार गौरी गडगे यांनी घेतली प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची भेट

**चौक : प्रतिनिधी**

अत्यंत अटीतटीच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला खालापूर तालुक्यात प्रथमच यश प्राप्त करून देणारे भारतीय जनता पक्षाचे वडगांव पंचायत समिती अध्यक्ष विनोद भोईर यांनी प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले.

खालापूर तालुक्यात आठ पंचायत समिती गणातून पाच महायुतीचे उमेदवार,तर जिल्हा परिषद गटातून चार पैकी दोन जागा महायुतीने जिंकून खालापूर पंचायत समितीवर महायुतीचा झेंडा फडकवला आहे. खालापूर तालुक्यातील वाशिवली गण हा महाविकास आघाडीचा बालेकिला होता. महायुतीत ही जागा भारतीय जनता पक्षाला मिळाली होती, त्यामुळे भारतीय जनता पक्षाचे पंचायत वडगांव विभाग अध्यक्ष विनोद भोईर यांनी महायुतीचे सर्व कार्यकर्ते यांना विश्वासात घेऊन ही प्रतिष्ठेची निवडणूक लढवून खालापूर तालुक्यात प्रथमच कमळ फुलविले.

पंचायत समितीचे विजयी उमेदवार सौ. गौरी गडगे, माजी सरपंच महादेव गडगे यांच्या समवेत प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण, उरण विधानसभा आमदार महेश बालदी यांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी विजयी उमेदवार सौ गौरी गडगे व अध्यक्ष विनोद भोईर यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.



# बारावीच्या परीक्षेला सुरुवात; गुलाबपुष्पाने विद्यार्थ्यांचे स्वागत



**मुरुड : प्रतिनिधी**

सर एस ए हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मुरुड जंजिरा येथे इयत्ता १२वी परीक्षा सुरळीत सुरू झाली. परीक्षा केंद्रावर एकूण ५२९ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या कॉपीमुक्त परीक्षा या कार्यक्रमाची काटेकोर अंमलबजावणी यावेळी करण्यात येत आहे. शाळेत पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात होता.

दिनांक मंगळवार दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी परीक्षेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना परीक्षेच्या शुभेच्छा देण्यासाठी जंजिरा विद्या मंडळाचे अध्यक्ष सुधाकर मधुकर दांडेकर, गटशिक्षणाधिकारी एस.टी. गवळी, शाळेचे मुख्याध्यापक सरोज राणे, पर्यवेक्षक बी एस मोरे, संचालक पांडुरंग आरेकर, उदय दांडेकर उपस्थित होते. परीक्षा सुरळीत होण्यासाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून विशेष मेहनत घेत आहेत.

# खांदाड येथे कुलस्वामिनी देवीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

श्रद्धेचा धागा, भक्तीची ओढ आणि पिढ्यान्पिढ्यांची परंपरा जपत खांदाड - माणगाव येथे पोवार घराण्याच्या कुलदैवत आई श्री कुलस्वामिनी देवीच्या स्थापनेचा व प्राणप्रतिष्ठेचा पवित्र सोहळा मंगळवार दि.१० फेब्रुवारी २०२६ रोजी अत्यंत मंगल,भक्तिभावपूर्ण आणि भावनांनी ओथंबलेल्या वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला. हा सोहळा केवळ धार्मिक विधी न राहता, तो प्रत्येक भक्ताच्या अंतःकरणाशी नाते जोडणारा आध्यात्मिक अनुभव ठरला.



आई कुलस्वामिनी ही पोवार घराण्याची केवळ कुलदेवता नसून, संकटात धीर देणारी मातृछाया, सुख-दुःखात मार्ग दाखवणारी आणि प्रत्येक पावलावर संरक्षण देणारी दैवी शक्ती आहे. तिच्या चरणी नतमस्तक होत, अनेक भाविकांनी डोळ्यांत अश्रू आणि मनात समाधान घेऊन या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्याचे भाग्य लाभले. सकाळी सोनभैरव मंदिरापासून निघालेली पालखी मिरवणूक पारंपरिक ढोल-ताशांचा निनाद, महिलांच्या ओव्या, युवकांचा जयघोष आणि आई कुलस्वामिनी माऊली की जय या घोषणांनी संपूर्ण परिसर भारावून गेला.

दुपारी श्री सत्यनारायणाची महापूजा झाली असता अनेक भक्तांनी आईच्या चरणी आपले दुःख, चिंता आणि मनोकामना अर्पण केल्या. सायंकाळी संगीत भजन कार्यक्रमात भक्तिरसाचा अक्षरशः पूर आला. अभंग, देवीची भजने आणि नामस्मरणात हरवलेले भाविक या क्षणी देव, भक्त आणि भक्ती यांच्यातील भेदच जणू नाहीसा झाला होता. काही भक्तांच्या चेहऱ्यावर आईच्या दर्शनाचे अपार सुख स्पष्ट दिसत होते. महाप्रसादाने या पावन सोहळ्याची सांगता झाली. हा संपूर्ण सोहळा ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ व नवयुवक मित्र मंडळ, खांदाड यांच्या अथक परिश्रमातून यशस्वी झाला.

# रायगडमध्ये १४ फेब्रुवारीला शासकीय योजनांचा महामेळावा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सर्वोच्च न्यायालय आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत १४ फेब्रुवारी २०२६ रोजी अलिबाग येथील कुरूळ येथील आरसीएफ हॉल येथे भव्य 'विधी सेवा शिबिर व विविध शासकीय योजनांचा महामेळावा' आयोजित करण्यात आला आहे.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत असून, याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तेजस्विनी निराळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या महामेळाव्याचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे शासनाच्या विविध कल्याणकारी योजना समाजातील वंचित, दुर्बल आणि गरजू घटकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे आणि त्यांना योजनांचा थेट लाभ मिळवून देणे हे आहे. जिल्हा प्रशासन, जिल्हा न्यायालय आणि पोलीस अधीक्षक कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम पार पडणार असून, कार्यक्रमात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र सावंत, जिल्हाधिकारी किशन जावळे तसेच जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलिस अधीक्षक आँचल दलाल आदी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

महामेळाव्यात विविध शासकीय विभागांचे स्वतंत्र स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत.




आरोग्य, शिक्षण, कृषी, समाजकल्याण, महिला व बालविकास, मत्स्यव्यवसाय, आदिवासी विकास, प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ), तसेच एसटी महामंडळ आदी विभागांमार्फत योजनांची सविस्तर माहिती नागरिकांना दिली जाणार आहे. विशेष म्हणजे, केवळ माहितीपुरते न राहता पात्र लाभार्थ्यांचे अर्ज जागीच भरून घेण्याची आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने नागरिकांना मोफत कायदेशीर सल्ला देण्यात येणार असून, विविध कायदेशीर हक्क, सरकारी योजना, तसेच न्यायालयीन प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले जाईल. याशिवाय, निवडक लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात योजनांच्या लाभांचे वाटपही करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात निवडणूक विभागाचाही स्टॉल असणार असून, नवीन मतदार नोंदणी, मतदार यादीत दुरुस्ती तसेच निवडणूक प्रक्रियेबाबत जनजागृती केली जाणार आहे.`.

# कर्जतमध्ये आघाडीचा विजय



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील जनतेने दोन महिन्यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना पक्षाला नगर परिषदेमध्ये सत्ता दिली. आता ग्रामीण भागातील मतदारांनी आमचे जिल्हा परिषद गटाचे सर्व उमेदवार विजयी करून विश्वास दाखवला आहे. कर्जत शहर आणि तालुका आमच्या पाठीशी आहे. आजचा आमचा विजय स्व. अजितदादा पवार यांना समर्पित करतो, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा अध्यक्ष सुधाकर घारे यांनी केले.

कर्जत तालुक्यात जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका राष्ट्रवादी काँग्रेस-शिवसेना-स्वाभिमानी रिपब्लिकन पार्टी व मित्र पक्ष अशा कर्जत परिवर्तन विकास आघाडीने १२पैकी १० जागा जिंकून निर्विवाद सत्ता मिळविली आहे.

# तळा केंद्रावर बारावी बोर्ड परीक्षा शांततेत सुरू

**तळा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेला आजपासून सुरुवात झाली आहे. तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळा केंद्र क्रमांक २७४१ बारावी फेब्रुवारी - मार्च २०२६ ची बोर्ड परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त व शांत वातावरणात पार पडत आहे.

परीक्षेच्या काळात गैरप्रकार रोखण्यासाठी २७१ भरारी पथकांसह अन्य काटेकोर उपाययोजना करण्यात आल्या आहेत. परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी यंदा अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

# वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉनचे डॉ. आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात आगमन

**माणगाव : बातमीदार**

कोकण किनारपट्टीच्या सुरक्षिततेसाठी केंद्र शासनाच्या सुरक्षित तट - समृद्ध भारत या मोहिमेअंतर्गत आयोजित वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉन २०२६ चे शुक्रवार, दिनांक १३ फेब्रुवारी रोजी विद्यापीठामध्ये आगमन होणार आहे. या उपक्रमामुळे कोकणात राष्ट्रभक्ती, सुरक्षा जनजागृती आणि नागरिक सहभागाला नवे बळ मिळणार आहे. ही सायक्लोथॉन डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे येथे सकाळी ठीक ९:०० वा (ध्वजप्रदर्शन/) होणार असून ही रॅली महाड सोवेली गाव (दापोली) दाभोळ गुहागर असा प्रवास करणार आहे.

लोणेरे येथे आयोजित ध्वजप्रदर्शन समारंभात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सायक्लोथॉनला अधिकृत प्रारंभ करण्यात येणार आहे.या सायक्लोथॉनमध्ये केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल .जिल्हा प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था, युवक-विद्यार्थी, महिला बचत गट तसेच मच्छीमार संघटनांचा सक्रिय सहभाग असणार आहे. वंदे मातरम् व सुरक्षित तट - समृद्ध भारत या घोषणांतून किनारपट्टी सुरक्षेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

या प्रसंगी नागरिकांना किनारपट्टीवरील सतर्कता, संशयास्पद हालचालींची त्वरित माहिती देण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात येणार आहे. आधुनिक तंत्रज्ञान, ड्रोन पाळत, सीसीटीव्ही व्यवस्था तसेच आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा अधिक सक्षम करण्यात आल्याची माहिती सुरक्षा अधिकाऱ्यांनी दिली.


## जाहीर सुचना

तमाम जनतेला कळवीण्यात येते की, माझे अशील **सौ. रमा रमेश इदनानी आणि श्री. रमेश लिलाराम इदनानी,** रा. १००८, कृषल टॉवर को.ऑप.हौ. सो.लि., डी विंग, जी.एम. रोड, शॉपर स्टॉप जवळ, चेंबुर, टिळक नगर, मुंबई ४०००८९, यांचे ताब्यातुन, त्यांचे मालकीच्या **सदनीका क्र.३०३, 'ए' विंग, अरिहंत अभिलाषा बिल्डींग, अरिहंत अभिलाषा को.ऑप. हौ.सो.लि., प्लॉट क. १०, सेक्टर ३५एच, मौजे खारघर, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२१०,** याचे बाबतचे अरिहंत अभिलाषा को.ऑप. हौ.सो.लि. ने जारी केलेले **समभाग क्र. १४१ ते १५० करीताचे मुळ भाग प्रमाणपत्र / शेअर सर्टीफीकेट क्र. १५,** माझे अशील यांचेकडून दिनांक ४/०१/२०२६ रोजी सेक्टर ३५एच, मौजे खारघर या भागात ते आले असता कुठेतरी पडून हरवीलेले / गहाळ झालेले आहे. आजरोजी मुळ भाग प्रमाणपत्राचा काळजीपुर्वक व सखोल शोध घेतला असता सुद्धा सदरचे मुळ भाग प्रमाणपत्र माझे अशीलांना सापडलेले नाही. त्याबाबत माझे अशील खारघर पोलिस स्टेशन, नवी मुंबई येथे देखील गहाळ वस्तु रजिष्टर मध्ये तक्रार नोंदवीणार आहेत.

तरी सदर गहाळ झालेल्या कागदपत्राच्या व वर उल्लेखीत मिळकतीच्या अनुशंगाने कोणास काही माहीती असल्यास अथवा कोणाचीही हरकत, दावा, तक्रार, तारण, गहाण, दान, बोजा, पोटगी वा अन्य कोणताही हक्क हितसंबंध असल्यास, त्या व्यक्तीनी ही नोटीस प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार वकील यांजकडे लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती दाखल न केल्या गेल्यास व मागाहून येणा-या हरकती हया जाणीवपुर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन, तसा गहाळ कागदपत्राचा व त्यातील उल्लेखीत मिळकतीच्या निर्वेधतेचा दाखला खाली सही करणार वकील देतील याची नोंद घ्यावी.

**नवी मुंबई**
**दि.१०/०२/२०२६**

**सही/-**
**ॲड. इर्शाद र. शेख**
**शॉप क. ७. मंजीरी पॅराडाईज, प्लॉट क.३, सेक्टर ३५ई, खारघर,**
**नवी मुंबई ४१०२१०**
**मो.क. ९८७०२२५१६६**



**महावितरण**

## ई-निविदा सुचना

महावितरण तर्फे अधीक्षक अभियंता, पेण मंडळांतर्गत Repairing of Dist. Transformer (Up to १०० KVA & above १०० KVA) साठी Empanelled Agency करीता एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीसाठी कामे करण्यासाठी कंत्राटदारांकडून निविदा क्र. SE/PC/T/TF Repair/T-०८ ते T-११/२०२५-२६ साठी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा महावितरण कंपनीच्या संकेतस्थळावर (https://etender.mahadiscom.in/eatApp) दि.११.०२.२०२५ ते दि.२८.०२.२०२५ (दुपारी ०५.०० वा) पर्यंत उपलब्ध आहेत. तसेच निविदा दि.२८.०२.२०२५ रोजी सायंकाळी ११.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. निम्नस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्विकारणे अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. तसेच कंत्राटदारांना विनंती करण्यात येते की, महावितरणच्या निविदा संकेतस्थळावर आपली नोंदणी करुन घ्यावी. तसेच निविदेबाबत काही मुदतवाढ किंवा शुध्दी पत्रकाबाबत फक्त संकेतस्थळावरील "Annoncements" मध्येच कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**PRO NO - 025** **अधीक्षक अभियंता, महावितरण, मंडळ कार्यालय पेण**



## निविदा सूचना

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) नियुक्तीसाठी स्वारस्य व्यक्त करण्यासाठी (EOI) आमंत्रण

| | | |
|---|---|---|
| एका दृष्टीक्षेपात कामाची व्याप्ती : | २ सोसायटींच्या एकत्रीकरणानंतर २ लगतच्या भूखंडांवर विद्यमान इमारतींच्या पुनर्विकासासाठी व्यापक सेवा प्रदान करणे, बांधकाम पूर्ण होईपर्यंत नियामक अनुपालन सुनिश्चित करणे आणि पुनर्विकसित प्रकल्पात विद्यमान फ्लॅट मालकांचा शांततापूर्ण कायदेशीर ताबा. | |
| पात्रता / लायकी : | इच्छुक पीएमसी कंपन्यांना मुंबई ठाणे/नवी मुंबई येथे अशाच प्रकारचे पुनर्विकास प्रकल्प हाताळण्याचा किमान पाच (५) वर्षांचा अनुभव असावा किंवा समाधानकारकपणे चालणारे किमान दोन (२) पुनर्विकास प्रकल्प असावेत. | |
| निविदा शुल्क : | दोन्ही प्रकल्पांसाठी (डीडी / सोसायटीच्या नावाने पे ऑर्डर) प्रत्येकी १०,०००/- रुपये (फक्त दहा हजार रुपये) परत न करण्यायोग्य ठेव. | |
| प्रकल्प/सोसायटी : | जीवन सागर सहकारी गृहनिर्माण सोसायटी लिमिटेडचा पुनर्विकास, प्लॉट क्रमांक ४, सेक्टर -१७, नवीन पनवेल (पूर्व), नवी मुंबई ४१०२०६ येथे आहे. | सुखसागर सहकारी गृहनिर्माण सोसायटी लिमिटेडचा पुनर्विकास, प्लॉट क्रमांक ५, सेक्टर १७, नवीन पनवेल (पूर्व), नवी मुंबई -४१०२०६ येथे आहे. |
| जमिनीचे क्षेत्रफळ : | सिडको लिमिटेडच्या मालकीचे ३३१८.८५ चौरस मीटर. | सिडको लिमिटेडच्या मालकीचे २२१२.७६ चौरस मीटर. |
| | एकत्रीकरणानंतर एकूण जमीन क्षेत्रफळ ५५३१.६१ चौरस मीटर होईल. | |
| निविदा कागदपत्रे जमा करण्याचे आणि सादर करण्याचे ठिकाण | सोमवार ते शनिवार संध्याकाळी ६:०० ते रात्री ८:०० पर्यंत. जीवन सागर सहकारी गृहनिर्माण सोसायटी लिमिटेड, प्लॉट क्रमांक ४, सेक्टर-१७, नवीन पनवेल (पूर्व), नवी मुंबई-४१०२०६ | |
| प्रारंभ तारीख आणि वेळ | १२/०२/२०२६ संध्याकाळी ६:०० वाजता | |
| शेवटची तारीख आणि वेळ | २२/०२/२०२६ संध्याकाळी ८:०० वाजता | |
| अधिक स्पष्टीकरणासाठी संपर्क तपशील, जर काही असेल तर : | श्री. प्रकाश नारायण पाटील (९३७२२९९९३३) श्री. के. डी. म्हात्रे (८०९७८५७७४९) | श्री. किरण विलास म्हाड्गुत (९८२०८३०५३५) श्री. सोमनाथ पंडित (९८३३११८०८५) |

**महत्वाची सूचना :** कोणतेही कारण न देता कोणताही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार सोसायटी राखून ठेवते.

**सही/-**
**सचिव**
**जिवनसागर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या,**
**सेक्टर-१७ नविन पनवेल, नवी मुंबई**

# बांधकाम साईटवर पालिकेचे लक्ष

## हवा गुणवत्ता सुधारणेकरिता कठोर उपाययोजना करण्याचे निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

हवा प्रदूषण नियंत्रणाकरिता राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांची अधिक प्रभावी अंमलबजावणी करावी व त्यामधील महत्वाचा घटक असणाऱ्या बांधकाम साईट्सवरील प्रदूषण प्रतिबंधासाठी कठोर पावले उचलावीत असे निर्देश महापलिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी दिले. विभागप्रमुखांच्या आढावा बैठकीप्रसंगी पर्यावरण, अतिक्रमण, स्वच्छता व शौचालय व्यवस्थापन, मालमत्ताकर, पाणीपट्टी, माहिती तंत्रज्ञान अशा विविध विभागांतील कामांचा सविस्तर आढावा आयुक्तांनी घेतला. या वेळी अधिकारी उपस्थित होते.



बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी महानगरपालिकेने जाहीर केलेल्या आदर्श कार्यप्रणालीनुसार विकासकांकडून हवा प्रदूषण प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवितांना सर्व प्रमाणकांचे यथोचित पालन केले जात आहे याबाबत विभाग अधिकारी तथा सहा.आयुक्त यांनी प्रत्यक्ष पाहणी करावी व नियमांचे उल्लंघन होत असल्यास नोटीस बजावावी व त्याकडे दुर्लक्ष केल्यास साईटवरील काम बंद करावे असे स्पष्ट निर्देश आयुक्तांनी दिले होते. त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा विभाग कार्यालयनिहाय आढावा आयुक्तांनी घेतला. यामध्ये १ हजार मीटरपेक्षा मोठया आकाराच्या बांधकाम साईट्सप्रमाणेच इतरही बांधकाम साईट्सची पाहणी करावी व त्याठिकाणीही नियमांचे पालन होत असल्याची खातरजमा करावी असे निर्देशित करण्यात आले. महानगरपालिकेमार्फत सुरु असलेली बांधकामांच्या ठिकाणीही नियमावलीचे पालन होत असल्याबद्दल पाहणी करावी असे आयुक्तांनी स्पष्ट केले.

आकाराने छोट्या-मोठ्या सर्वच बांधकाम साईटसवर हवा गुणवत्तादर्शक यंत्रे बसविणे व त्याचा तपशील पवर इंटीग्रेटेड करणे गरजेचे असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारची हयगय खपवून घेतली जाणार नाही असे स्पष्ट निर्देश आयुक्तांनी दिले. महत्वाचे म्हणजे ही हवा गुणवत्तादर्शक यंत्रे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची मान्यता असलेल्या अधिकृत पुरवठादारांकडूनच घेतलेली असावीत जेणेकरुन त्या निर्देशांकांमध्ये अधिकृतता असेल असे आयुक्तांनी स्पष्ट केले.

बांधकाम साईट्सवर नियमावलीनुसार कार्यवाही होत असल्याची तपासणी करण्यासाठी विभाग कार्यालय स्तरावर पाहणी पथके स्थापन करावीत व त्यांच्यामार्फत नियमित तपासणी सुरु ठेवावी असे निर्देश देण्यात आले. विभागीय कार्यक्षेत्रातील प्रदूषण नियंत्रणासाठीच्या उपाययोजनांची प्रभावी व काटेकोर अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबधित विभागाचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी यांची असून त्यांच्यामार्फत अधिक प्रभावी व ठोस कार्यवाही करण्यात यावी असे आयुक्तांनी निर्देश दिले.

सद्यस्थितीत राबविण्यात येणाऱ्या सखोल स्वच्छता मोहीमांची व्याप्ती वाढवावी व त्यामध्ये नियमितता ठेवावी अशा सूचना आयुक्तांनी दिल्या. सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांतील सुविधांची खातरजमा करुन घ्यावी व त्याठिकाणी सातत्यपूर्ण स्वच्छता राहील याकडे बारकाईने लक्ष द्यावे असे निर्देश दिले. पालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या १४ गावातील स्वच्छता व सुविधांबाबत गतीमान पावले उचलावीत असेही आयुक्तांनी सूचित केले.

### अतिक्रमण हटविण्याला गती देण्याच्या सूचना

अनधिकृत इमारतींबाबत न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे कठोरपणे पालन करणे गरजेचे असल्याचे सूचित करीत अनधिकृत बांधकाम विरोधी मोहीम अधिक तीव्र व गतीमान स्वरुपात राबवावी असेही निर्देश आयुक्तांनी या वेळी दिले. याबाबतची भरारी पथके जलद स्थापन करावीत व कार्यवहीला वेग द्यावा अशा सूचना देण्यात आल्या.

### लोकप्रतिनिधींच्या सहभागातून सर्वांगीण विकास

महापौर-उपमहापौर निवडणूक नुकतीच झाली असून लोकप्रतिनिधी सक्रीय झाले आहेत. त्यांच्याशी सर्व विभागप्रमुखांनी सुसंवाद ठेवून महानगरपालिकेमार्फत सुरू असलेल्या कामांची माहिती त्यांना द्यावी व शहर विकासासाठी एकत्रीतपणे व परस्पर सहयोगाने काम करावे अशाही सूचना आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी या वेळी दिल्या.

# सीवूड्स सेक्टर ४८ येथील पाळणाघर आठ वर्षांपासून बंद

## माजी नगरसेवक विशाल डोळस यांच्याकडून कायदेशीर नोटीस

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या महासभेने मंजूर केलेला सिवुड्स सेक्टर ४८ येथील पाळणाघर प्रकल्प अद्याप कार्यान्वित न केल्याने प्रशासनाच्या निष्क्रियता, नियोजनशून्य कारभार आणि सार्वजनिक निधीच्या संभाव्य अपव्ययाचा गंभीर मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या प्रकरणी माजी नगरसेवक विशाल राजन डोळस यांच्या वतीने यांनी समाज विकास विभागाच्या उपायुक्तांना कायदेशीर नोटीस बजावली आहे.

सन २०१८ मध्ये कामकाजी पालकांना सहाय्य व्हावे या उद्देशाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या महासभेने पाळणाघर उभारण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार सिवुड्स विभागातील सेक्टर ४८ येथे सन २०२१ मध्ये पाळणाघराची स्वतंत्र इमारत उभारण्यात आली. या इमारतीच्या बांधकामासह अंतर्गत सुविधा, रंगरंगोटी, सीसीटीव्ही यंत्रणा आदींसाठी लाखो रुपयांचा सार्वजनिक निधी खर्च करण्यात आला, मात्र महासभेच्या मंजुरीला जवळपास आठ वर्षे उलटूनही सदर पाळणाघर अद्याप सुरू करण्यात आलेले नाही.

डोळस यांनी पाठवलेल्या कायदेशीर नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे की, पाळणाघर सुरू न केल्याने भारतीय संविधानातील कलम १४, २१, ३८ व ३९ तसेच कलम २४३ (w) अंतर्गत नगरपालिकांवर असलेल्या सामाजिक जबाबदाऱ्यांचे उल्लंघन होत आहे. कामकाजी पालकांसाठी अत्यावश्यक असलेल्या बालसंगोपन सुविधांचा अभाव हा त्यांच्या उपजीविकेच्या व मुलांच्या कल्याणाच्या हक्कावर घाला असल्याचा आरोप नोटीसमध्ये करण्यात आला आहे.

महापालिकेने पाळणाघर चालविणे हे अनिवार्य नसून स्वेच्छाधीन स्वरूपाचे काम असल्याची भूमिका घेतल्याचा आरोपही करण्यात आला आहे. ही भूमिका महासभेच्या मूळ निर्णयाशी विसंगत असून, प्रशासनाच्या भूमिकेतील बदलामुळे सार्वजनिक निधीच्या वापरावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

जर पाळणाघर सुरू करण्याचा प्रशासनाचा हेतूच नव्हता, तर इमारत उभारण्यासाठी आणि अंतर्गत सुविधांवर खर्च करण्याची आवश्यकता का भासली, तसेच गेल्या अनेक वर्षांपासून इमारत वापराविना पडून असताना खर्च कोणत्या निर्णयाच्या आधारे करण्यात आला, याचे कोणतेही सार्वजनिक स्पष्टीकरण देण्यात आलेले नसल्याचे नोटीसमध्ये नमूद आहे.

या प्रकरणामुळे सिवुड्स परिसरातील कामावर जाणाऱ्या पालकांमध्ये तीव्र नाराजी असून, पालिकेच्या निष्क्रियतेविरोधात मोठ्या प्रमाणात टीका होत आहे. नोटीसमध्ये प्रशासनाकडे पाळणाघर तातडीने कार्यान्वित करण्याचा निर्णय घेणे, आतापर्यंत झालेल्या सर्व खर्चाचा तपशील जाहीर करणे, तसेच सार्वजनिक निधीच्या अपव्ययास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तर, नोटीस प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांत महापालिकेच्या समाज विकास विभागाच्या उपायुक्तांनी समाधानकारक उत्तर न दिल्यास, संबंधित प्रकरणी उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यासह योग्य ती दिवाणी व फौजदारी कार्यवाही करण्याचा इशाराही, विशाल डोळस यांनी नोटीसीत दिला आहे.





**पनवेल : जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत भाजप महायुतीने घवघवीत यश संपादित करत सर्व आठ जिल्हा परिषद गट आणि १५ पंचायत समिती गणांमध्ये झेंडा फडकावला आहे. वडघर जिल्हा परिषद गटाच्या विजयी उमेदवार सोनाली जितेकर, वडघर पंचायत समिती गणाच्या उमेदवार मनिषा पाटील आणि करंजाडे पंचायत समिती गणाच्या रंजना वास्कर यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची मंगळवारी भेट घेऊन आशीर्वाद घेतले. या वेळी भाजपनेते सुभाष म्हात्रे, के.ए. म्हात्रे, गजानन पाटील, कुंडेवाहळ ग्रामपंचायतीचे सरपंच सदाशिव वास्कर, प्रकाश जितेकर, प्रकट कडू आदी उपस्थित होते.**

# वासांबे जिल्हा परिषद विभागात महायुतीचे वर्चस्व

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याचे लक्ष लागलेल्या वासांबे जिल्हा परिषद विभागात भाजपा पक्षाला निर्विवाद वर्चस्व मिळाले असून जिल्हा परिषद व वासांबे मोहोपाडा व रिस पंचायत समितीवर भाजपाचे उमेदवार निवडून आले आहे.

जनतेचे जिल्हा परिषद प्रभागातील निवडणूकीत सर्वाधिक लक्ष लागलेला प्रभाग म्हणजे वासांबे जिल्हा परिषद या निवडणुकीत महाविकास आघाडीविरुद्ध महायुती अशी रंगत पहायला मिळाली. दरम्यान महाविकास आघाडीच्या वतीने जिल्हा परिषदेसाठी संदीप सुदाम मुंढे, वासांबे मोहोपाडा पंचायत समितीसाठी रोशन बाळाराम राऊत व रिस पंचायत समितीसाठी निखिल डवळे उमेदवारी लढवत होते, तर महायुतीच्या वतीने जिल्हा परिषदेसाठी नेहा पारंगे, वासांबे मोहोपाडा पंचायत समितीसाठी अर्चना आत्माराम भोईर व रिस पंचायत समितीकडून कृष्णा गंगाराम पारंगे हे दंड थोपटून होते.



महाविकास आघाडीत राजकारणातील दोन अनुभवी नेतृत्व व एक नवीन चेहरा होता. तर त्या उलट महायुतीत एक अनुभवी व दोन नवीन चेहरे पाहायला मिळाले. ही लढत इतकी घमासान ठरली की, त्या प्रभागातील सर्व मतदारांचे लक्ष वासांबे प्रभागात कोण बाजी मारणार यावर होते. अखेर याचा निकाल लागला असून वासांबे जिल्हा परिषद प्रभागात महायुतीने कमाल केली. संपूर्ण पॅनलमध्ये महायुतीतील भाजपचे उमेदवार निवडून आल्याने वासांबे जिल्हा परिषद प्रभागात कमळ फुलल्याचे दिसून आले.

निकालाची सुरुवात होताच पहिल्या फेरी पासून वासांबे जिल्हा परिषद प्रभागाच्या नेहा पारंगे यांनी संदीप मुंढे यांना पिछाडीवर टाकत ५०० ते ६०० मतांनी लीड घेतला होता. तो जोर कायम राखत १० व्या फेरी अंती १३४३ मतांनी विजयी मिळवीला. तर वासांबे पंचायत समिती गणात अर्चना भोईर यांनी रोशन राऊत यांनी ११८६ मतांनी मात दिली आणि रिस पंचायत समिती गणात कृष्णा पारंगे यांनी निखिल डवळे विरोधात अवघ्या ६९८ मतांनी विजय प्राप्त केला.

एकंदरीत वासांबे जिल्हा परिषद प्रभागात आणि त्या अंतर्गत असणाऱ्या रिस व वासांबे पंचायत समिती गणात महायुतीने बाजी मारली.आपले उमेदवार विजयी झाल्याने महायुतीच्या उमेदवारांनी मोहोपाडा मैदानावरून नवीन पोसरी ते रिस अशी विजयी रॅली काढली. या वेळी ठिकठिकाणी विजयी उमेदवारांचे औक्षण करण्यात आले. परिसरात अनुचित प्रकार घडू नये म्हणून रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# उरण महोत्सव उत्साहात साजरा

**उरण : वार्ताहर**

आमदार महेश बालदी मित्र मंडळ आणि अस्तित्व महिला सक्षमीकरण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सात ते आठ फेब्रुवारी एन आय.हायस्कूल उरणच्या मैदानावर उरण महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते .

आमदार महेश बालदी व नीता बालदी व त्यांच्या कार्यकारिणी सदस्यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन नीता बालदी यांच्या हस्ते करण्यात आले. दुसऱ्या दिवशी भाजप महिला मोर्चा उरण तालुकाअध्यक्ष राणी म्हात्रे यांनी दीप प्रज्वलन केले.



महोत्सवाचे आयोजन उरण शहर महिला अध्यक्ष संपूर्णा थळी, नगरसेविका रजनी कोळी, माजी नगरसेविका जान्व्ही पंडित, अस्तित्व महिला साक्षमिकरण संस्थेचे सभासद पुनम पाटेकर, सानिका कदम, हेमा घरत माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे व स्टेप डान्स ॲकॅडमीचे निर्माता पप्पू सूर्यराव आदिनी आयोजन केले.

सुरगंगा म्युझिकल ग्रुपच्या संस्थापिका गायिका पूनम पाटेकर, कल्याणी कोळी, गायक विनोद ठाकूर व अंबरीश म्हात्रे यांनी मराठी व हिंदी सदाबहार गाणी सादर केली.

आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत लकी ड्रॉद्वारे आकर्षक भेट वस्तूचे वाटप करण्यात आले. ज्या व्यक्तींनी विशेष क्षेत्रात कामिगिरी केली आहे अश्यांना उरण गौरव देवून सन्मान चिन्ह देवून सन्मानित करण्यात आले. उरण गौरव पुरस्काराचे सूत्रसंचालन गौरी मंत्री यांनी केले.

या वेळी नीता बालदी, उपनगराध्यक्ष रवी भोईर, भाजप उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह, नगरसेवक गणेश पाटील, राजेश ठाकूर, नगरसेविका रजनी कोळी, पूर्वा वैवडे, सायली पाटेकर, रिबेका मढवी, उरण शहर महिला अध्यक्ष संपूर्णा थळी, स्नेहल कासारे, प्रियांका पाटील सीमा घरत रपपळ आणि जासई विभाग अध्यक्ष शमिता दत्ता ठाकूर आदी उपस्थित होते.

# 'भाविप'तर्फे ऊर्जिता पुरस्कार वितरण सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत विकास परिषद (भाविप), पनवेल शाखेच्या वतीने उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना 'ऊर्जिता' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. येथील मॉंटेरिया व्हिलेजमधे या सोहळ्याचे तसेच प्रांतस्तरीय महिला स्नेहमिलन कार्यक्रमाचेही यशस्वी आयोजन करणात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मेधा किरीट सोमया व गुरप्रीत कौर या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या.

पनवेल येथील उद्योजिका सुनंदा कोठारी, फायर वुमन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गीतांजली पाटील, झारखंडमधील लुप्त होत चाललेल्या 'जाडो पाटिया' चित्रकलेला पुनरुज्जीवित करणाऱ्या मीनू आनंद, लेखिका, नाटककार व कलाकार अक्षता आचार्य, तसेच देश-विदेशातील युद्धग्रस्त भागांमध्ये कार्यरत रुग्ण, डॉक्टर व मदतकार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे मानसिक स्वास्थ्य जपण्यासाठी व त्यांचा मनोबल वाढविण्यासाठी कार्य करणाऱ्या डॉ. कामिनी देशमुख यांना 'ऊर्जिता' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या सोहळ्याला राष्ट्रीय महिला सहभागिता गतिविधी सदस्या प्रिया पंसारी, प्रांतीय महिला सहभागिता डॉ. कीर्ती समुद्र, प्रांत संघटन मंत्री रवी प्रकाश या मान्यवरांसह मुंबई-कोकण प्रांतातील विविध शाखांचे सदस्य, यांच्यासह पनवेल परिसरातील नागरिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

पनवेल शाखेचे अध्यक्ष सुबोध भिडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. डॉ. सरोजिनी नायडू यांच्या जयंतीनिमित्त तसेच राष्ट्रीय महिला दिनाच्या औचित्याने, उल्लेखनीय कार्य करणाऱ्या, मात्र प्रशंसा, प्रसिद्धी व पुरस्कारांपासून दूर राहणाऱ्या महिलांचा शोध घेऊन भारत विकास परिषद, पनवेल शाखेच्या वतीने उर्जिता पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यात येतो, अशी माहिती पनवेल शाखेच्या सचीव पद्मजा कुलकर्णी यांनी दिली.





**उरण : ॲड.पराग दत्तात्रेय म्हात्रे यांची नगर परिषदेमध्ये स्वीकृत नगरसेवकपदी निवड झाली आहे. त्यांचे उपनगराध्यक्ष रवी भोईर, शहर अध्यक्ष भाजप कौशिक शाह, नगरसेवक जसीम गॅस, जयविंद्र कोळी, राजेश ठाकूर, गणेश पाटील, नगरसेविका सायली म्हात्रे, दमयंती म्हात्रे, रजनी कोळी, सायली पाटेकर, पूर्वा वैवडे, रिबेका मढवी, विशाल पाटेकर, संदीप पानसरे, निलेश पाटील आदींनी अभिनंदन केले.**

# प्रजापती समाज विकास मंडळाची कार्यकारिणी बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रजापती समाज विकास मंडळ रजि. राष्ट्रीय सामाजिक संस्था (एनजीओ) यांची कार्यकारिणी बैठक पनवेल येथे संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष चंद्र प्रताप प्रजापती यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीपणे पार पडली. बैठकीत संघटनात्मक उपक्रमांचा आढावा घेण्यात आला तसेच भविष्यातील योजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.



बैठकीदरम्यान ११ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या २१व्या वार्षिक अधिवेशनाचा आढावा घेण्यात आला. अधिवेशनाबाबत सदस्यांनी दिलेल्या सूचनांवर गांभीर्याने विचार करण्यात आला आणि आगामी कार्यक्रम अधिक प्रभावी व सुव्यवस्थित करण्यासाठी अनेक सूचना सर्वसम्मतीने स्वीकारण्यात आल्या. राष्ट्रीय अध्यक्ष चंद्र प्रताप प्रजापती यांनी अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यकारिणीतील सर्व पदाधिकारी, सदस्य आणि सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचे आभार मानले.

लव कुमार प्रजापती यांची पनवेल महानगरपालिका क्षेत्रासाठी युवा प्रकोष्ठ अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. या वेळी राष्ट्रीय मुख्य महासचिव गजेंद्र प्रजापती, रायगड जिल्हा महासचिव इंदर प्रजापती, न्यू पनवेल शहर अध्यक्ष गोवर्धन प्रजापती, सुबोध प्रजापती, इंद्र कुमार प्रजापती, पिंटू प्रजापती, संजय प्रजापती, सियाराम प्रजापती, राकेश कुमार प्रजापती, रोहित प्रजापती, संजय पन्नालाल आदी उपस्थित होते.

# रायगड जिल्ह्यात भाजप होतोय मजबूत!

## महाड विधानसभेत पाय रोवले

**महाड : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजपने राष्ट्रवादीसोबत युती केली होती. भाजपने महाड, पोलादपूर आणि माणगाव विधानसभेत दोन जिल्हा परिषदा आणि तीन पंचायत समितीच्या निवडणुका लढवल्या. या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजपला १५,०५४ मतदान झाले. तर सहा जिल्हा परिषदा भाजपने लढवल्या नाहीत. सहा जिल्हा परिषदांमध्ये दीड-दीड हजार मते पकडली तरी नऊ हजार मते होतात. ही नऊ हजार मते पकडली तर साधारणता २४ ते २५ हजार मते भाजपची महाड विधानसभेत तयार झाली असून जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या माध्यमातून भाजपने महाड विधानसभेत पाय रोवल्याचे बोलले जात आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या निकालानंतर भाजप विधान परिषद गटनेते आमदार प्रवीण दरेकर म्हणाले की, कार्यकर्त्यांनी ना उमेद न होता आपण पहिल्यांदाच जिल्हा परिषद व पंचायत समिती लढवली. सर्व कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे आणि ताकदीने काम केल्याबद्दल त्यांचे आभार मानतो. न उमेद न होता पक्षवाढीसाठी राष्ट्रवादीशी समन्वयातून विकासकामे करा, असे आवाहन केले.

जिल्हा परिषद व केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून विकास कामांसाठी मी व पक्ष आपल्या पाठीशी असेन असा विश्वास देत जरी महाड, पोलादपूर आणि माणगाव विधानसभेत भाजपाला यश मिळाले नसले तरी जिल्हा परिषदेत राष्ट्रवादी आणि भाजपची सत्ता आली याचा आनंद आहे. कार्यकर्त्यांनी ना उमेद होता राष्ट्रवादी, शिवसेना व इतर सर्वांची मदत घेऊन जनतेला दिलेला शब्द पूर्ण करूया, असे आवाहनही आमदार प्रवीण दरेकर यांनी केले आहे.

## मुरूड तालुक्यात शिंदे शिवसेनेचे वर्चस्व

### पंचायत समितीवर भगवा फडकला



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांकरीता सार्वत्रिक निवडणूक २०२६ करिता शिंदे शिवसेना पक्षांचे जिल्हा परिषद सदस्य दोन उमेदवार तर पंचायत समितीच्या तीन जागेवर उमेदवार निवडून येऊन महाआघाडी पक्षाला जोरोसे झटका दिला.

कोर्लई ३७ गटातुन शिंदे शिवसेना पक्षांचे उमेदवार ज्योती रमेश नागावकर ८९०३ मते मिळाली, भाजप पक्षाचे उमेदवार ॲड.मनस्वी महेश मोहिते ८२६९ मते मिळाली यामध्ये शिंदे शिवसेना पक्षांचे ज्योती रमेश नागांवकर ह्या ६३४ मतांनी निवडून आल्या तर पंचायत समिती सदस्य पदाकरीता

बोर्ली गणातुन शिंदे शिवसेना पक्षांचे निलेश शांताराम घाटवळ २१८८ मतांनी निवडून आले. कोर्लई गणातून,भाजप पक्षांचे उमेदवार अश्विनी जयवंत ड़ोगरीकर २७३ मतांनी निवडून आल्या.

जिल्हा परिषद सदस्य पदाकरीता ३८ राजपुरी गटातुन उमेदवार अजित बाळकृष्ण कासार ७५९५मते मिळाली तर शिंदे शिवसेना पक्षांचे उमेदवार विघ्नेश विजय माळी यांना ११९५५ मते मिळाली. तर नोटाला २६४ मते मिळाली या मधुन शिंदे शिवसेना पक्षांचे उमेदवार विघ्नेश विजय माळी हे ४३६० मतांनी भरघोस मतांनी विजयी झाले आहेत.

पंचायत समिती नांदगाव ७५ गणातून शिंदे शिवसेना पक्षांचे उमेदवार गणेश प्रभाकर नाक्ती यांनी २००४ मतांनी विजयी झाले. पंचायत समिती राजपुरी ७६ गणातून शिंदे शिवसेना पक्षांचे उमेदवार अश्विनी संजय जंगम ह्या २८४८ मतांनी विजयी झाले.

## धामणेंच्या प्रवेशामुळे कातेंचा विजय

**नागोठणे : बातमीदार**



कोंडगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते कृष्णा धामणे यांनी अलिबाग मुरूडचे आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रमुख उपस्थितीत नागोठणे छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिव पुतळ्या जवळ आपल्या समर्थकांसह शिंदे शिवसेनेत जाहीर प्रवेश केला त्यामुळे नागोठणे जिल्हा परिषद गटातील शिंदे शिवसेनेचे उमेदवार सुमित काते यांच्या विजयाचा मार्ग सुकर झाल्याचे शिंदे शिवसेनेचे कोंडगाव विभागातील नेते विजय धामणे यांनी दै. रामप्रहरशी बोलताना सांगितले.

मतदानाच्या दोन दिवस आगोदर (दि.५) कृष्णा धामणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस रोहा तालुका उपाध्यक्ष पदाचा राजीनामा देऊन शिंदे शिवसेनेत प्रवेश केला. कृष्णा धामणे यांनी दोन रात्र व एक दिवसात संपूर्ण वातावरण बदलून टाकले. कृष्णा धामणे यांनी कोंडगाव विभागात सुमित काते यांची ताकद वाढवून त्यांचे मताधिक्य वाढविण्यात मोलाची भूमिका निभावली.

कृष्णा धामणे यांच्यासह वांगणी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच ठाकरे शिवसेनेचे नेते लहु तेलंगे यांनीदेखील सुमित काते यांचे इमानेइतबार काम करून वांगणी विभागात मताधिक्य वाढविण्यासाठी फार महत्वपूर्ण भूमिका निभावलीअसे शेवटी विजय धामणे यांनी सांगितले.

## विजयी मुलीवर फुलांचा वर्षाव

### वडील कृष्णाशेठ ठाकूर यांनी व्यक्त केला आनंद



**चौक : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद निवडणुकीत आपली मुलगी जिंकल्याचा आनंद वडिलांनी, आपल्या मुलीवर फुलांचा वर्षाव करून व्यक्त केला. या वेळी वडील भावनाविवश झाल्याचे दिसत होते.

खालापूर पंचायत समिती व रायगड जिल्हा परिषद निवडणुकिचा निकाल जाहीर झाला. वासांबे गणातून अर्चना भोईर, रीस गणातून कृष्णा गंगाराम पारंगे हे भारतीय जनता पक्षाचे दोन्ही उमेदवार निवडून आले. त्यांच्याबरोबर वासंबे गटातून नेहा भूषण पारंगे याही भारतीय जनता पक्षाचे उमेदवार निवडून आल्याने त्यांना आशीर्वाद देण्यासाठी त्यांचे वडील कृष्णा ठाकूर हे पनवेल येथून आले होते, आई टाकादेवी मंदिरात लेक बापाची गळा भेट झाल्यावर वडिलांनी मुलगी नेहा सहित दोन्ही विजयी उमेदवार यांचे फुलांच्या वर्षावात अभिनंदन केले.

आपल्या वडिलांच्या आशीर्वादाने नेहा भूषण पारंगे यांना गहिवरून आले होते.

# दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना विजय समर्पित



**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील मोर्बा जिल्हा परिषद गटातून राजिपचे माजी कृषी सभापती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अस्लम इब्राहिम राऊत व मोर्बा पंचायत समिती गणातून माणगाव पंचायत समितीच्या माजी सभापती अलका सुभाष केकाणे हे विजयी झाल्यानंतर मोर्बा शहरात वाजत-गाजत दोघांची विजयी मिरवणूक काढून जल्लोष करण्यात आला.

मोर्बा जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणाची तालुक्यातील हि निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व शिवसेना पक्षाने प्रतिष्ठेची केली होती. मोर्बा जिल्हा परिषद गटात राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार अस्लम राऊत यांना ९४८३ तर त्यांचे प्रतिस्पर्धी शिवसेनेचे रमेश मोरे यांना ७६३५ मते मिळाली. या गटात अस्लम राऊत हे १८४८ मतांनी विजयी झाले. मोर्बा पंचायत समिती गणातून राष्ट्रवादीच्या अलका केकाणे यांना ७००० मते मिळाली तर त्यांचे प्रतिस्पर्धी शिवसेना पक्षाचे पल्लवी मोरे यांना २८४५ इतके मते मिळाली. या गणातून अलका केकाणे ४१५५ मतांनी विजयी झाल्या. या दोघांच्या विजयानंतर मोर्बा शहरातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी वाजत - गाजत विजयाचा जल्लोष केला.

या वेळी कार्यकर्त्यांना संबोधित करताना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुभाष केकाणे म्हणाले की, मोर्बा गटातील व गणातील जनतेचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. आपण सर्वानी हातात हात घालून अथक परिश्रम घेऊन पक्षाचे व आपल्या उमेदवारांचे काम करून अस्लम राऊत व अलका केकाणे यांना विजयी केले. हा विजय मी आपल्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना समर्पित करतो.

जिल्हा परिषद गटातून विजयी झालेले अस्लम राऊत या वेळी बोलताना म्हणाले की, आपण सर्वांनी मला व केकाणे मॅडम यांना विजयी केले तो विजय खऱ्या अर्थाने जन शक्तीचा आहे. आपले नेते खा. तटकरे साहेब व मंत्री आदिती तटकरे यांच्या माध्यमातून मोर्बा जिल्हा परिषद गटात झालेली विकासकामे यांना विभागातील जनतेने प्राधान्य देऊन आम्हाला विजयी केल्याबद्दल मी सर्वांचेच मनापासून ऋण व आभार मानले.

## सुरक्षित इंटरनेट दिनानिमित्त अलिबाग येथे विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

**रायगड : रामप्रहर वृत्त**



राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (NIC), जिल्हाधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग यांच्या वतीने सुरक्षित इंटरनेट दिवस निमित्त (०९ फेब्रुवारी रोजी) पी.एन.पी. कॉलेज, अलिबाग येथे विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन व्याख्यान कार्यक्रम संपन्न झाला.

या व्याख्यान कार्यक्रमात दैनंदिन जीवनात इंटरनेटचा सुरक्षित वापर, सायबर फसवणूक, सोशल मीडिया वापरताना घ्यावयाची काळजी, ऑनलाईन व्यवहारातील सुरक्षितता तसेच वैयक्तिक माहितीचे संरक्षण याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी निलेश लांडगे यांनी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना सायबर सुरक्षेबाबत सखोल माहिती देत डिजिटल युगात जागरूक राहण्याचे महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी या व्याख्यानातून सायबर विश्वातील संभाव्य धोके व त्यावरील उपाययोजना समजून घेतल्या.

या कार्यक्रमास पी.एन.पी. कॉलेजचे प्राचार्य श्री. पोटे यांच्यासह राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राचे अभियंते निखिल पडते, विराज चांगे व योगेश कराड उपस्थित होते.

## माता रमाई फाउंडेशनची स्थापना

**पाली : प्रतिनिधी**



त्यागमूर्ती माता रमाई भिमराव आंबेडकर यांच्या १२८ व्या जयंती दिनी 'माता रमाई फाउंडेशन' या सामाजिक व शैक्षणिक संस्थेचा भव्य उदघाटन सोहळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह पाली येथे झाला.

सुधागड तालुका बौद्धजन पंचायत २७५६ संस्थेचे सुप्रीम कमिटी अध्यक्ष मारुती गायकवाड, ज्येष्ठ मार्गदर्शक प्रभाकर गायकवाड, जयवंत कांबळे, मध्यवर्ती कमिटीच्या माजी महिला अध्यक्षा नूतन शिंदे, रोहिणी जाधव, मनीषा कांबळे, संस्थेच्या महिला सचिव निता कांबळे, यशवंत कांबळे, विलास जगताप, मोरेश्वर कांबळे, तसेच संस्थेचे ग्रुप शाखेचे प्रमुख पदाधिकारी महिला व भिम अनुयायी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

या वेळी माता रमाई फाउंडेशनचे अध्यक्ष निशांत पवार, उपाध्यक्ष अक्षय गायकवाड, खजिनदार तथा कायदेशीर सल्लागार ॲड. सुशिल गायकवाड, सचिव सिद्धांत गायकवाड, सहसचिव विवेक रोकडे, सल्लागार विष्णू गायकवाड, संघटक चेतन भालेराव, सदस्य अमोल पवार, राशी पवार आदी पदाधिकारी तर नितीन वाघमारे, किरण कांबळे, आकाश गायकवाड सहकारी उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी माता रमाई फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले. व पुढील वाटचालीस शुभेच्छा देत आगामी काळात संस्थेच्या माध्यमातून सामाजिक व शैक्षणिक कार्यासाठी सदिच्छा दिल्या. या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष अक्षय गायकवाड यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. या मंगलदिनी माता रमाई फाउंडेशनच्या वतीने उपस्थितांना श्रीखंड पुरी अल्पोपाहार दिला.

## अंजुमन कॉलेजमध्ये दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद



**मुरूड : प्रतिनिधी**

रासायनिक विज्ञान, भौतिक विज्ञान, जीवन विज्ञान आणि संगणक तंत्रज्ञानातील विविध ट्रेंड्सवर पाचव्या दोन दिवशीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, रयत शिक्षण संस्थेचे वीर वाजेकर महाविद्यालय फुंडे उरण व माणगांव शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे महाविद्यालय माणगांव यांच्या संयुक्त विद्यमाने हायब्रिड पद्धतीने (ऑनलाईन व ऑफलाईन) आयोजित करण्यात आली.

या परिषदेचे उद्घाटन अंजुमन महाविद्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात उत्साहात पार पडले. उद्घाटन समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा चे कुलगुरू मा. डॉ. ज्ञानदेव के. म्हस्के, तसेच सन्माननीय पाहुणे म्हणून मुंबई विद्यापीठाचे विज्ञान व तंत्रज्ञान अधिष्ठाता डॉ. शिवराम गर्जे,रयत शिक्षण संस्थेचे माजी सहसचिव डॉ. दिनानाथ डी. पाटील, अंजुमन इस्लाम जंजिराचे जनरल सेक्रेटरी हिफझूररेहमान नझीर, जॉईंट सेक्रेटरी अब्दुलरहीम काबले, खजिनदार अल्ताफ हुसेन मलिक, महाविद्यालयाचे अध्यक्ष मा. जैनुद्दीन कादिरी, महाविद्यालय व्यवस्थापन समिती सदस्य इमरान मलिक व इस्माईल शेख, वीर वाजेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर, अंजुमन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. साजिद शेख आदी उपस्थित होते.

मान्यवरांचा सत्कार समारंभ झाल्यावर या परिषदेमध्ये सादर होणाऱ्या शोधनिबंधाच्या पुस्तकीचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. या दोन दिवशीय आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये विविध क्षेत्रातील ३५० संशोधकांनी सहभाग घेतला असून मुरूड व परिसरातील भौगोलिक परिस्थितीचा हि अभ्यास कारण्यात येणार आहे. या परिषदेचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. साजिद एफ. शेख व प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी केले.

प्रमुख पाहुणे कुलगुरू मा. डॉ. ज्ञानदेव के. म्हस्के यांनी परिषदेचे महत्व विशद करून काळाची गरज काय आहे व विज्ञानाचे महत्व यावर मार्गदर्शन केले. अंजुमन महाविद्यालयाचे अध्यक्ष मा. जैनुद्दीन कादिरी यांनी मनोगत व्यक्त केले.

या परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी सह-समन्वयक प्रा. तमसील शहजहान, प्रा. डॉ. अनिल पालवे व प्रा. मेहरीन डावरे, आयोजक सचिव डॉ. गुरमीत वाधवा व प्रा. अल्ताफ फकीर यांनी विशेष परिश्रम घेतले. सत्रांचे सूत्रसंचालन प्रा. स्वालीहा कारबारी यांनी प्रभावीपणे केले. तसेच विद्यार्थी फातिमा सुरवे, आयेशा देशमुख, अमरीन चापेकर, अझमा चिलवण, अब्दुलरहमान भारून आणि अरफात उल्डे यांनी स्वयंसेवक म्हणून परिषद यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

## ठाणे संस्कृती आर्ट फेस्टिवल फोटो स्पर्धेत सुधीर नाझरेंचा गौरव

**मुरूड : प्रतिनिधी**




ठाणे संस्कृती आर्ट फेस्टिवलमध्ये पंढरपूर वारी या विषयावर राज्यभरातून छायाचित्र स्पर्धेसाठी मागवण्यात आली होती. हजारो चित्रातून सुधीर नाझरे यांच्या चित्राला प्रथम क्रमांकचा पुरस्कार सन्मानचिन्ह रोख रक्कम परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते देण्यात आला.

सोबत प्रिसिडंट पूर्वेश सरनाईक, अरुणकुमार सुवर्णा आदी मान्यवरांनी नाझरे यांच्या फोटोची प्रशंसा केली. वारीचे सुंदर दर्शन ठाणेकरांना घडवलेत, असेच चांगले फोटो द्या, असे त्यांना सांगण्यात आले.

ठाणे उपवन आर्ट गॅलरी येथे गेल्या चार दिवसांत तीन लाख ठाणेकरांनी भेट देऊन पांडुरंगाची वारीचा आनंद घेतला. आळंदी व देहू येथून माऊलींची व तुकारामाची पालखी पंढरपूरला पायी वारकरी वारी करतात त्यावेळचे जिवंत अनुभव टिपण्याचे काम सुधीर नाझरे यांनी केले आहे. गेली १५ वर्ष वारीचे छायाचित्रण करत असल्याने वारीतील प्रत्यक्ष क्षणाचे फोटो संग्रही आहेत. इतर छायचित्रकाना सन्मानित केले ते सुभाजित मुखर्जी, हरी मुलमुले, अक्षय चंद्रकांत येवगे, महेश अंबरे, प्रशांत एस. खरोटे, सोहम बावस्कर, जय मावळे, शरद इरागोंडा पाटील यांचा सहभाग होता.

गेल्या वर्षी रशियात झालेल्या फोटो अलोम्पिक २०२५साठी भारतातून ९५ फोटाग्राफरची स्पर्धेतून निवड करण्यात आली. त्यात भाताचे पाच फोटोग्राफर निवडले त्यात महाराष्ट्रातून सुधीर नाझरे यांची निवड झाली होती.

## 'लाडक्या बहिणीं'ना ई-केवायसीची संधी उपलब्ध

**रायगड :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली आहे.

तथापि ही प्रक्रिया पूर्ण करताना लाभार्थ्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित कायम कर्मचारी/कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ, भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत नसावा किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहे किंवा कसे याबाबतचा पर्याय निवडताना नजरचुकीने चुकीचा पर्याय निवडण्यात आलेला आहे, अशा लाभार्थी महिलांसाठीच ऑनलाईनमध्ये पुन्हा एकदा सुधारणा करण्याची संधी ३१ मार्च २०२६ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेली असून ६ फेब्रुवारी २०२६ रोजी याबाबतचा शासननिर्णय निर्गमित करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीकांत हावळे यांनी दिली आहे.

या अनुषंगाने योजनेच्या पोर्टलवर सुधारणा करण्यात आली आहे, यापुढे कोणत्याही परिस्थितीत सुधारणा करण्याची संधी उपलब्ध करुन दिली जाणार नाही.

## श्रीवर्धनचे सचिन ठसाळ भारतीय सेनेत कॅप्टन पदावर पदोन्नती

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यासाठी अभिमानास्पद अशी घटना घडली असून, खुजारे हनुमानवाडी गावचे सुपुत्र सचिन गणपत ठसाळ यांची भारतीय सेनेत कॅप्टन या अत्यंत मानाच्या व वरिष्ठ पदावर नियुक्ती झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे संपूर्ण श्रीवर्धन तालुका आणि रायगड जिल्हा तसेच महाराष्ट्रा राज्याचा नावलौकिक वाढला आहे.

सचिन ठसाळ यांनी लहानपणापासूनच शिस्त, मेहनत आणि देशसेवेचे स्वप्न मनाशी बाळगले होते. सातत्यपूर्ण अभ्यास, कठोर प्रशिक्षण आणि अपार जिद्दीच्या जोरावर त्यांनी भारतीय सेनेत अधिकारी पदापर्यंत मजल मारली.

या ऐतिहासिक यशाची बातमी समजताच खुजारे हनुमानवाडी गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. गावकरी, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच विविध सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अनेकांनी त्यांना देशसेवेच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या असून, सचिन ठसाळ हे आजच्या तरुण पिढीचे आदर्श आहेत अशी भावना व्यक्त केली जात आहे.

त्यांच्या उज्वल भविष्यासाठी, देशसेवेत अधिक मोठी कामगिरी करण्यासाठी सर्व स्तरातून शुभेच्छा दिल्या जात असून, रायगड जिल्ह्याला अशा वीर सुपुत्राचा अभिमान वाटत आहे.

# अभिनंदन अन् शुभेच्छा!






















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com